# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष ११ अंक ५-६] आषाढ-श्रावण | श. [illegible]



संपादक—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | पृष्ठें |
| अवघीं २७ मिनिटें ... ... ... ... | १-१४ |
| सत्तावीस मिनिटांचा चमत्कार ... ... ... | १५-२० |
| उंच स्वरानें भगवन्नाम उच्चारण्यांत होणारे लाभ ... | २१-२४ |
| अनुभव ... ... ... ... ... | २५-२७ |
| ज्ञानाचें ऋण ... ... ... ... | २८ |
| रामनवमीच्या उत्सवाचा अहवाल... ... ... | २९-३२ |
| अनुभव ... ... ... ... ... | ३३-३६ |
| श्रीशैलधि ( शिर्डी ) संस्थानचें संक्षिप्त वृत्तान्तकथन ... | ३७-४४ |
| शके १८५६ सालच्या श्रीरामनवमीच्या ... ... उत्सवाच्या जमाखर्चाचा तपशीलवार खर्डा ... | ४५-६२ |
| रामनवमी-उत्सवांत मजूर, गडी वगैरेंना दिलेल्या पैशांचा तपशील | ६३-६४ |

## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V.P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V.P. करण्याचें सुचवावें.

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक—श्रीसाईलीला
५१ E, पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती, तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. कि. रु. २

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक—श्रीसाईलीला कचेरी.

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,
—प्रकाशक.

# अवघीं २७ मिनिटें ! ! !

चालू सालच्या शनिवार ता. १४ जुलै रोजीं संध्याकाळीं पार्ल्याचे श्री. दाजी विठ्ठल सांवारे श्रीगुरुपौर्णिमेची दक्षिणा देण्यासाठीं घरीं आले होते, त्या वेळीं झालेला संवाद:—

" दाजीसाहेब ! बनूबाई कशी आहे ? आज ७-८ वर्षे झालीं, मुलीनें कसें तें तोंड दाखविलें नाहीं. "

" बाबासाहेब ! आपण तिला जी तिच्या संकटाच्या वेळीं रक्कम दिली होती, त्या रकमेची फेड अद्यापपर्यंत तिच्याकडून न झाल्यामुळें तिला वाईट वाटत आहे, आणि त्यामुळें तुम्हाला तिला तोंड दाखवितां येत नाहीं. "

" पण दाजीसाहेब, तिची परिस्थिति मला ठाऊक नाहीं काय ? हें पाहा, तिची गांठ पडल्यास तुम्ही तिला सांगा कीं, सवड साधून तूं मला जरूर भेट. तुला पाहावेंसें वाटतें. तुझ्या अडचणी मला ठाऊक आहेत. श्रीगणपतिउत्सवांत तुझीं कीर्तनें झाल्याचीं मला कळतात. श्रीमत् परमहंस श्रीगाडगेबुवा तुझ्या घराला 'बनूताईची मठी म्हणतात' हें मला ठाऊक आहे. तरी मला भेटावयास जरूर ये. "

" बरें तर; उद्यांच्या पुढील रविवारीं ( म्हणजे ता. २२ रोजीं ) श्री. बनुला तुमच्या घरीं दोन प्रहरीं घेऊन येतों, आणि तिचें भजन श्रीसाईबाबांच्या पुढें करूंया. "

मीं म्हटलें, " उत्तम. "

रविवार ता. २२ चा दिवस उजडला. **मनूबाईंच्या भजनाची पूर्ण विस्मृति.** कारण श्रीशिर्डीचा खर्चाचा तक्ता मध्यंतरीं झाला होता व आषाढ महिन्याच्या खर्चासाठीं पैशाची मागणी होती, त्यामुळें त्या खर्चासाठीं एक चेक व श्रीसाईलीलेचा अ. वैशाख, वैशाख, व ज्येष्ठ या तीन महिन्यांच्या जोड अंकाचें बिल चुकविण्यासाठीं एक चेक अशा दोन चेकांवर रा. ब. मो. वि. प्रधान यांच्या सह्या घ्यावयाच्या. कारण रविवारखेरीज ते इतर दिवशीं त्यांच्या सान्ताक्रूझ येथच्या त्यांच्या घरीं स्वस्थ चित्तानें मिळावयाचे नाहींत, म्हणून, सान्ताक्रूस येथें दोन प्रहरानंतर चार वाजतां जाण्याची उत्कंठा.

सकाळपासून दोनप्रहरनंतर श्रीगुरुपौर्णिमेच्या व इतर कामासाठीं वर्गणी देण्याकरितां मंडळी राहून राहून येत गेली. त्या सर्वांचा परामर्श घेण्यांत व त्यांना पावत्या व उदी देण्यांत वेळ निघून जाऊं लागला आणि शरीराला अस्वस्थता असल्यामुळें, सान्ताक्रूसला जाण्यासाठीं मोटर आण म्हणून नोकराला सांगणार, इतक्यांत श्री. सांबारे, श्री. दुखंडे व श्री. बनु ही मंडळी हजर.

"बरें झालें; तुम्ही आलांत. कारण आतांच श्री. प्रधानांच्या घरीं जाणार होतों, आणि तुमची व माझी चुकामूक होऊन उभयतांना वाईट वाटलें असतें !"

"वाहवा बाबासाहेब ? " श्री. सांबारे म्हणाले.

आज अपॉइन्टमेन्ट (भेट) केली असतां तुम्ही ती चुकवली असती ?"

" खरें सांगूं दाजीसाहेब, तुम्ही याक्षणीं आठवण देईपर्यंत मला त्याची पूर्ण विस्मृति होती ! ! "

असें म्हणून उद्यां सकाळीं श्री. प्रधान यांजकडे चेकवर सह्या घेण्यासाठीं जावें असा मनांत संकल्प करून आलेल्या मंडळीच्या आदरातिथ्यासाठीं घरांत सूनबाईना सांगून पाहुणेमंडळीबरोबर श्रीसाईबाबांच्या गुणानुवादन-कथा बोलण्यांत चकचूर झालों. कसलें भजन नि कसलें काय ! श्रीसाईमाउलीच्या गोड कथा व आठवणी काढण्यांत आणि त्यांविषयीं बोलण्यांत सर्व मंडळी दंग झाली.

दाजीसाहेब म्हणाले, "बाबासाहेब ! आज बारा वर्षे झालीं, बनूच्या मनांत शिरडीस जाऊन श्रीबाबांच्या समाधिपुढें कीर्तन करावें असें सारखें वाटत आहे. "

" अहो, तशी इच्छा असल्यास बाबा तसेंही घडवून आणतील. " मी म्हणालों.

बनूताई[1] डोळ्यांत आंसवें आणून म्हणाल्या, " माझे गुरु मला नेईन नेईन म्हणतां, तेही गेले'. श्रीसाईबाबा माझ्या गुरुचे गुरु म्हणजे माझे आजोबा. मला दीनाला त्यांच्या समाधीचें कधीं दर्शन होईल अशी सारखी तळमळ मनाला लागली आहे. "

मी म्हणालों, " श्रीसाईबाबा तुमचे मनोरथ पार पाडतील. "

---

१. श्रीयुक्ता बनूबाईचें आडनांव मालवणकर. त्यांच्या गुरूचें नांव श्रीबाळकृष्ण शिंदे. म्हणून त्या आपलें नांव 'बनुबाई बाळकृष्ण शिंदे' असें लावतात. " श्रीशिंदे हे जातीनें मराठे गृहस्थ. रॅलीब्रदर्स कंपनीमध्यें मोठ्या हुद्यावर दरमहा साडेतीनशें रुपये पगारावर होते. त्यांनीं त्या कंपनीची सेवा इमानेइतबारें पुष्कळ वर्षें केली. पुढे पुढे

या व अशाच इतर गोष्टी चालल्या असतां रा. ब. प्रधान अत्यंत अनपेक्षित रीतीनें दत्त म्हणून आम्हां सर्वांपुढें हजर !

" प्रधानसाहेब, मी आपल्या घरीं आतांच येणार होतों. " मी म्हणालों.

" आलां असतां तर माझी भेट झाली नसती. " प्रधानांनीं प्रत्युत्तर केलें, आणि तात्काळ एक लहान कागदाची घडी मला दिली.

" बाबासाहेब ! ही मोठयानें वाचा " असें म्हणाले.

ती कागदाची घडी उकलून वाचलें, तों त्यांतली अक्षरें " बनुबाईनें शिरडीस जावें " अशीं होतीं.

---

दिवशीं साहेबाच्यापुढें उभे असतां त्यांना पुढयांतल्या कागदावरचीं अक्षरें एकाएकी दिसेनाशीं झालीं. साहेबाला त्यांनीं आपली परिस्थिति सांगीतली. पुष्कळ वर्षांची त्यांची नोकरी असल्यामुळें साहेबानें त्यांना सेवानिवृत्त होण्याास सुचविलें. पडत्या फळाची आज्ञा समजून त्यांनीं त्याच दिवशीं शिरडीला धांवून श्रीसाईमाउलीचे चरण वंदून त्यांच्यापाशीं गुरुमंत्राची याचना केली. बाबा म्हणाले " तुझा गुरु पुण्याजवळ आहे. तो तुला गुरुमंत्र देईल, तो पांच वेळां तुला सांगेल; तो तुला समजला तर ठीक. पांच वेळां बोलूनही तुला नुमगला, तर मात्र तुझें तूं पाहून घे. "

हे शब्द ऐकतांच त्यानें ही श्रीसाईबाबांची आज्ञा मानून त्यांच्या चरणांचें वंदन करून जी धांव ठोकली,ती केडगांवच्या श्रीनारायणमहाराजांपाशीं. श्रीनारायणमहाराजांनी " तुला श्रीसाईबाबांनीं पाठविलें काय ? " असें विचारून कांहीं शब्द उच्चारिले. त्याला समजेना. दुसऱ्यानें, तिसऱ्यानें, चवथ्यानें,व नंतर पांचव्या वेळीं त्याच्या डोक्यांत प्रकाश पडून त्यांनीं तो नामाचा गजर चालविला व गुरुकृपा प्राप्त करून घेतली. " अशी हकीकत श्रीबनूबाईनें मला सांगितली. या श्रीबाळकृष्णमहाराजांनी श्रीबनुबाईला जाहीर कीर्तनें करावयाची आज्ञा केली, हे श्रीबाळकृष्णमहाराज श्रीबनुचे गुरु व त्यांचे गुरु श्रीसाईबाबा सबब श्रीसाईबाबा हे आपले आजोबा, अशी परंपरा श्रीबनुबाई मानीत आहेत.

ते कागद सानंदाश्रुयुक्त मुद्रेनें मी शिरावर आज्ञा म्हणून ठेवले आणि नंतर श्री. दाजीसाहेब वगैरे मंडळीला म्हणालों, " पाहा ही बाबांची लीला ! कुणाच्या ध्यानीं-मनीं-स्वप्नीं तरी होतें काय, कीं बनुताईचें कीर्तन या वर्षी गुरुवारीं गुरुपौर्णिमेच्या दिवशीं शिरडीस श्रीसाईमाऊलीनें योजलें आहे तें ?"

सर्व मंडळीला अत्यंत गहिंवर आला. श्री. दाजीसाहेब म्हणाले, "मी जरूर चारपांच दिवसांची रजा घेईन आणि बनूबरोबर येईन. बुधवार ता. २५ रोजीं सकाळीं अलाहाबाद एक्स्प्रेसनें सव्वासात वाजतां सर्व मंडळीने बोरीबंदर स्टेशनवर एकत्र मिळावें असें ठरलें, आणि बनुताईच्या वाटखर्चा-साठीं कांहीं रक्कम मीं श्री. दाजीसाहेबांना दिली.

ही योजना पाहून रा. ब. प्रधान यांना अत्यंत समाधान वाटून ते चेकांवर सह्या करून घरीं गेले.

त्यानंतर श्रीसाईबाबांच्या या अतर्क्य लीलेविषयीं सप्रेम अंतःकर-णानें संभाषणें होऊन ही सर्व मंडळी ८–३० वाजतां रात्रीं घरीं गेली.

बुधवारीं सकाळीं खारवरून आपल्या राहत्या घरून निघून सकाळची ७–१५ ची अलाहाबाद एक्स्प्रेस V. T. वर गांठणें हें कांहीं स्वल्प काम नव्हतें. शरीराला अस्वास्थ्य तर होतेंच. मन बरेंच डगमगलें. तरी पण त्या दिवशीं सकाळीं साडेचार वाजतां उठून, स्नान करून ५-४० वाजतां वांद्रा स्टेशनवर हारबर ब्रांचची गाडी पकडण्यास गेलों. तेथें रा. ब. प्रधान व श्री. वसंतराव गोरक्षकर भेटले. साडेसाहाच्या सुमारास आम्ही बोरीबंदर स्टेशनवर पोहचलों. तेथें दाजीसाहेब आले होते. थोडया अवकाशानें

रा. ब. वासुदेवराव अनंत प्रभु वांबर्डेकर भेटले. या सद्गृहस्थांचा कै. गोविंद-राव दाभोळकरांबरोबर अनेक वर्षांचा परिचय. श्रीनाशीकच्या करन्सी नोटांच्या सरकारी प्रेसवर चीफ सुपरवायझर कंट्रोल या जोखमाच्या हुद्यावर त्यांनीं अनेक वर्षे नोकरी केली व मुंबईच्या टांकसाळेशीं त्यांचा अत्यंत परिचय. पुराणवस्तुसंशोधनाचा त्यांचा हव्यास. त्यांचे या व इतिहास संशोधनासंबंधाचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. या गहन विषयांचा अनेक वर्षांचा अभ्यास असूनही त्यांची राहणी अत्यंत नम्र, निगर्वी व मनमिळाऊ अशी आहे. श्रीशिरडीस श्रीसाईमाउलीची द्वारकामाई व समाधि पाहावी, तेथें पूजाअर्चा कशी काय चालत आहे तें अवलोकनांत घ्यावें, स्वतः श्रीज्ञानेश्वरींचे भोक्ते असल्यामुळें श्रीबाळकृष्ण विश्वनाथ देव यांचा परिचय व्हावा, या हेतूनें आपणही श्रीशिरडीस याच गाडीनें जावें असा संकल्प करून तो मला त्यांनीं पूर्वींच कळविला होता.

रा. ब. प्रधान व इतर मंडळींचा रा. ब. वांबर्डेकरांबरोबर मी परिचय करून दिला.

त्यांनीं ही वनूबाई कोण, म्हणून पृच्छा केली मी त्यांना जी अल्प माहिती आहे ती सांगितली. बाईंचा निदिध्यास श्रीदत्तगुरुचा व श्रीसाई-बाबांचा असे फोटो देव्हाऱ्यांत ठेवून त्यांच्या पुढें नित्य नियमानें पूजा, अर्चा करणें, पोथ्या वाचणें, नाहीं जन्मांत कोणतेंही नाटक पाहिलें, नाहीं नाटकाचीं पुस्तकें वाचलीं; सर्व हव्यास श्रीगुरुसेवेचा, श्रीपरमेश्वरावर पूर्ण विश्वास आणि आज १४ वर्षे आश्रय त्याचाच. नाहीं इतर कुणाचा. आचरण शुद्ध. नाहीं मद्यमांस, मच्छीसेवन.

बांबर्डेकर म्हणाले, "बाबासाहेब तिकडे कोकणांत अशी शुद्ध आचरणयुक्त मंडळी आहे, कीं ज्यांची राहणी एखाद्या पवित्र ब्राह्मणाला लाजवील."

अशा आमच्या गोष्टी चालल्या असतां श्री नवलकरादि मंडळी अद्याप आली नव्हती, त्यांच्या शोधासाठीं रा. ब. प्रधान हे थर्डक्लासच्या पुलाकडे गेले होते, ते परत आले. मध्यंतरीं श्री. दाजीसाहेब म्हणाले, "बाबासाहेब, सर्व ऑफस झालें आहे ! बनूचें येणें होत नाहीं असें म्हणून वाटखर्चा-साठीं दिलेली रक्कम त्यांनीं मला परत दिली. रा. ब. प्रधान हे परत आले, त्या वेळीं त्यांना ही हकीकत मीं सांगितली. ते चकित झाले. आतां गाडी सुटावयास **अवघीं सत्तावीस मिनिटें राहिलीं होतीं.**

पुढें काय झालें व श्रीसाईबाबांनीं श्रद्धा ठेविली असतां अवघ्या सत्तावीस मिनिटांत काय लीला दाखविली, हें रा. ब. प्रधान त्यांच्याच शब्दांत सांगतील.

## रा. ब. प्रधान त्यांच्या लेखांत लिहितात:—

" शनिवार ता. २१-७-३४ रोजीं सकाळीं ७॥ वाजतां रा. ब. दौंवडे आमच्या घरीं आले व त्याच रात्रीं ८॥ वाजतां त्यांच्याकडे श्रीसत्य-नारायणाची पूजा होती व श्री. वनूबाईचें कीर्तन होतें, त्याबद्दलचें निमंत्रण अत्यंत आग्रहानें दिलें.

---

१. या लेखाचा मथळा " अवघीं सत्तावीस मिनिटें " असावा, हें रा. ब. बांबर्डे-करांनीं सुचविलें.

२ मुंबईचे रिटायर्ड डेप्युटी पो. कमिशनर; हल्लीं वस्ती सांताक्रुझ.

श्री. तावडे येण्यापूर्वी १५ मिनिटें श्रीरामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर[1] निवर्तल्याची वातमी फोननें आली होती. त्यामुळें मन अस्वस्थ झालें होतें. तरी पण श्री. तावडे यांच्या आमंत्रणाला होकार देणें भाग पडलें. त्याच दिवशीं ११॥ वाजतां गला वांद्रास जरूरीचें काम होतें. तेथें जाऊन वेळ मिळाल्यास कै. नवलकरांच्या शेवटच्या दर्शनास जाण्याचा बेत होता. पण १ वाजेपर्यंत वांद्र्यांत रखडलों, व नंतर मुंबईस थेट साई-भुवनमध्यें गेलों. दुसऱ्या दिवशी आषाढी एकादशी होती, व सौ. लीला-बाई बाळंत होण्याकरितां त्याच दिवशीं सकाळीं येणार होती, म्हणून एका-दशीच्या फराळाची सर्व सामुग्री सौ. शांताबाईकडेच खरेदी करून घरीं ३ वाजतां परत आलों. घरची मंडळी दुसऱ्या दिवसाच्या फराळाच्या तया-रीच्या कामांत सात वाजेपर्यंत गुंतली होती. ७॥ वाजतां मुंबईहून आमच्या मेहुणीचा नोकर तोंडी निरोप घेऊन आला कीं, सौ. लीलाबाई अजिंक्य हास्पिटलमध्यें सकाळीं १० वाजतां गेल्या व तेथें पांच वाजतां बाळंत होऊन मुलगी झाली. बाळंतीण सुखरूप आहे, पण बाळ ७ महिन्याचें असल्या-मुळें २-४ दिवस खात्री देतां येत नाहीं व हास्पिटलमध्यें **आतां जातां येणार नाहीं.** उद्यां सकाळीं ८ ते ९ पर्यंत व्हिजिटर्स घेतात. या गोष्टी ८॥ वाजेपर्यंत झाल्या. इतक्यांत रा. ब. तावडे यांची मोटर आली. मोटर-ड्रायव्हरला सांगितलें कीं, आम्ही अद्यापि फराळ केला नाहीं. तो म्हणाला, ' हरकत नाहीं. मी थांबतों. तुम्हाला आलेंच पाहिजे. ' आम्ही ९। वाजतां रा. ब. तावडे यांच्या घरीं पोंचलों आणि ९॥ वाजतां कीर्तन सुरू झालें.[2]

---

१. श्रीशिरडींतल्या " नवलकरवाड्याचे " मालीक.

२. इतकी सविस्तर हकीकत वाचून रा. ब. प्रधान यांच्या त्या कीर्तनास हजर होण्यासाठीं सर्व अडचणी श्रीसाईमाउलीनें दूर केलेल्या स्पष्ट दिसतात. –रा. आ. तर्खड

कीर्तन भक्तिभावाच्या उत्तम रंगांत येऊं लागलें. १०-१०॥ च्या सुमारास मला वाटलें कीं, या बाईचें कीर्तन येत्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवांत श्रीसाईबाबांच्या समाधीपुढें व्हावें. कारण श्रीगवईबुवा आजारी होते व दुसरा कोणीही कथेकरीबुवा यावयाचा नव्हता. कीर्तन संपल्यावर कळलें कीं, दुसऱ्या दिवशीं (रविवारीं) बनुबाईचें भजन बाबासाहेब तर्खड यांच्या येथें करण्याची योजना झाली होती. रविवारीं सकाळीं घरची मंडळी सौ. लीलाबाईच्या चौकशीस अजिंक्य हास्पिटलमध्यें गेली.

मजकडे त्या वेळीं ताऱ्याचे कोळी कामाकरतां आले होते. ते सहज म्हणाले कीं, ताऱ्याच्या देवळांत मंगळवारीं दुपारीं २—७ बनूबाईचें कीर्तन करावयाचें ठरलें आहे व बनूबाई फारच उत्तम कीर्तन करिते, असें मला सांगू लागले. मी त्यांना बनुबाईविषयीं कांहीं एक म्हणालों नाहीं. दुपारीं ४ वाजतां मला मुंबईत कांहीं कामें होतीं म्हणून निघालों, तों माझा डबा ग्रांटरोडवर उभा होता, त्याच्यासमोर पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर बनुबाई व विष्णुपंत यांना खारकडे जाण्याकरतां हजर असलेले पाहिलें. मुंबईतील कामें उरकून विचार केला, व श्रीबाबांची काय आज्ञा आहे ती चिठी टाकून पाहिली. तसाच खारवर बाबासाहेबांकडे गेलों, आणि आलेली चिठी बाबासाहेबांच्या हातांत दिली. तेथें बनुबाई, विष्णुपंत व दाजी सांवारे हजर होते.

श्रीसाईबाबांच्या आज्ञेची चिठी बाबासाहेबांनीं मोठ्यानें वाचली, मस्तकावर ठेवली आणि म्हणाले, " आतां ही मंडळी प्रत्यक्ष हजर आहेत, त्यांना विचारा. "

बनुबाई म्हणाल्या, " आज बारा वर्षे माझ्या मनास शिर्डीस जाण्याचें सारखें घोळत आहे, पण कांहींना कांहीं कारणामुळें जुळत

नाहीं. श्रीगुरुपूर्णिमेचें पाल्यांस एक कीर्तन करण्याचा तगादा लागल आहे, तो गुरुवार आहे म्हणून नाकारिला. मंगळवारीं तान्यावरचें कीर्तन संपल्यावर रात्रीं ७॥–८॥ वाजतां आम्ही सान्ताक्रुझला वस्तीला येऊं व सर्वजण बुधवारीं सकाळीं तेथूनच बोरीबंदरवर ( व्हिक्टोरिया टर्मिनस ) जाऊं."

असें ठरल्यावर मी बाबासाहेबांची रजा घेऊन घरीं परत आलों.

मंगळवारीं दुपारीं तान्यावरच्या देवळांत सौ. छोटुबाई व सांटाक्रुझची इतर मंडळी गेली होती.

कीर्तनांत बनुबाई कोळी लोकांस म्हणाल्या कीं, आज मीं आपणांस शब्द दिला होता म्हणून आलें. पण आजचा माझा दिवस फारच गर्दीचा आहे; कारण उद्यां सकाळीं मला शिर्डीस गुरुपौर्णिमेच्या उत्सवाकरितां जाणें भाग पडलें आहे.

कीर्तन संपल्यावर बनुबाईनें सौ. छोटुबाईला कळविलें कीं, आम्ही आतां मुंबईस जातों व उद्यां सकाळीं बोरीबंदरावर आम्ही हजर राहूं.

दुसऱ्या दिवशीं, बुधवारीं सकाळीं, मी व वसंतराव गोरक्षकर बाबासाहेब तर्खडांना वांद्र्याच्या स्टेशनवर भेटलों व तिघेजण V. T. ला पोंहोंचलों. तेथें दाजी सांवारे आगच्या आधीं एकटे हजर होते. तेव्हां ६॥ वाजले होते. ६॥। वाजेपर्यंत दाजी कांहींच बोलले नाहींत. आम्ही आमचें सामान एका डब्यांतून काढून दुसऱ्या डब्यांत घातलें. ३० माणसांच्या डब्यांतून काढून २८ माणसांच्या डब्यांत घातलें. डबा सर्व रिकामा होता, व पलीकडच्या बाजूनें येणारांस २५ पावलें जवळ झाला. त्याच वेळीं रा. ब. वांबर्डेकर हेही आम्हांत सामील झाले. ६॥। वाजल्यावर दाजीसाहेबांनी बाबासाहेबांस रुपये परत केले व बनुबाई येत नाहीं, कारण शिर्डीस

जाण्याचें बोलणें काढलें कीं कोण शिकलें म्हणून चिठी टाकली, त्यांत " जाऊं नको " असें आलें म्हणून वनुबाई, विष्णुपंत वगैरे मंडळी मनांत फार खंति होऊन, अशी कशी भलती चिठी आली, याबद्दल फार नाराज होऊन गेली, व रात्रीं कोणास स्वप्न पडलें व त्यांत जाण्याचा हुकूम असला तर जाऊं असें ठरलें. रात्रीं ११ वाजतां श्री. सांबारे आले, त्यांना वरील सर्व कळविलें.

सांबारे म्हणाले, "आतां मी काय सागूं ? बाबांची इच्छा." सकाळीं उठून कोणास कांहीं स्वप्न वगैरे नाहीं.

श्री. सांबारे वर सांगितल्याप्रमाणें V. T. ला आले व पुष्कळ वेळा-नंतर पैसे परत केले.

वरील सर्व हकीकत श्री. सांबाऱ्यांच्या तोंडून ऐकली व एकमतें आम्हीं सर्वांनीं दाजीसाहेब सांबारे याना सांगितलें कीं, आतांच्या आतां तुम्ही मोटरनें वनुकडे जा ( म्हणजे खेतवाडींत ) व मंडळीस मोटरनें आणा. ही ट्रेन साधली तर उत्तम, नाहीं तर रात्रीच्या गाडीनें निघा, व गुरुवारीं सकाळीं तरी शिरडींत दाखल व्हा. दाजी साहेबांचें पाऊल उचलेना. पैसे परत देऊन त्यांना जबरदस्तीनें घालविलें. वसंतरावांनीं त्यांना मोटरमध्यें बसविलें व मोटरवाल्यास सांगितलं कीं मंडळीस ७। च्या गाडीस आणशील

---

१. एकदा श्रीसाईमाउलीची आज्ञा झाली तीच खरी. त्यानंतर शिंका वगैरे शंकाकुशंकादि मानसिक दौर्बल्याच्या विचारांच्या कात्रींत मन सांपडलें, कीं **श्रद्धा** म्हणजेच परमेश्वर ( पाहा विवेकानंद ) दूरावतो आणि मन अश्रद्धेच्या आंदोलनांत सांपडून त्रस्त होतें व विश्वास लुप्त होतो. —ग. आ. त.

तर तुला बक्षिस देऊं, व मोटरीस वसंतरावांनीं श्रीमायमाउलीची उदी लावली. त्या वेळीं अवघीं २७ मिनिटंच होतीं.

आम्हीं चहा वगैरे गाडींतच घेतला. ७ वाजून ८ मिनिटांनीं सेक्रेटरी श्री. सुंदरराव नवलकर व श्री. पुरंदरे हळूहळू आले व आमच्या डब्यांत दाखल झाले.

७ वाजून १२ मिनिटें झालीं तेव्हां रा. ब. वांद्रेकर व बाबासाहेब तर्खड म्हणाले, "आतां बनुबाईचें येणें अशक्य" ७ वाजून १४॥ मिनिटें झालीं. तेव्हां श्री. वसंतराव गोरक्षकर ओरडले, "ती पाहा मंडळी आली !!" व एथंदर सर्व मंडळी धांवपळ करीत व धापा टाकीत आली. सामान गाडीच्या खिडक्यांतून हमालांकडून घेतलें व सहाजण गाडींत शिरतांक्षणीच गाडी चालू झाली !

पहिला डबा रिकामा झाला होता, तरी बाबासाहेब तर्खडांनीं कांहीं तरी सबब काढून सर्व नीट लावलेलें सामान हमालांना पुन्हा बोलावून पलीकडच्या २५ पावलें दूरच्या रिकाम्या डब्यांत भरविलें, म्हणून धांवणाऱ्या मंडळीला २५ पावलें कमी धांवावें लागलें, आणि त्यामुळें निःसंशय गाडी साधली गेली.

---

१. किती अप्रतिम श्रद्धा ?

२. श्री. बनुबाईच्या घरीं दाजीसाहेब गेले व चला म्हणून तगादा केला, त्या वेळीं त्या मंडळीची काय धांदल झाली, त्याचें वर्णन श्री. दाजीसाहेबांनीं स्वयंस्फूर्तिनें पुढील कवितांत उत्तम रीतीनें केलें आहे:—

दादर स्टेशन येईतोंपर्यंत धांवणारी मंडळी दम घेऊन श्वासोच्छ्वास करीत होती.

ठाण्यास खारकर वगैरे मंडळी आली. आमचा डबा V. T. पासून थेट मनमाडपर्यंत जणूं काय स्वतंत्र आम्हाकरतांच बाबांनीं योजिला होता.

जातांना नांव लागली, तरी सर्व प्रवास सुखाचा होऊन ४ वाजतां शिरडींत पोंहचलों.

मनमाडपासून आमच्याबरोबर श्रीमंत पूर्णचंद्र भय्या होते. २२ जणांपैकीं १८ जण एका स्पेशल मोटरनें श्रीगंगेच्या पैलतीरापासून शिरडीस गेलों. बाकीचे ४ जण दुसऱ्या मोटरनें आले. प्रवास सुखाचा झाला.

श्रीगुरुपौर्णिमेचें कीर्तन श्रीद्वारकामाईंत रात्रीं १० पासून ११ वाजेपर्यंत झालें. कीर्तन फारच सुंदर झालें, म्हणून दुसऱ्या दिवशीं मंडळी जास्त येईल म्हणून तेथेंच करविण्याचें ठरलें. पण बाबांची लीला अगाध! शुक्रवारीं संध्याकाळपासून पाऊस जोराचा पडूं लागला. कीर्तन समाधि-मंदिराखेरीज इतर ठिकाणीं करणें अगदीं अशक्य झालें.

---

## श्रीसाई मल्लीनाथ समर्थ

चल, चल, जलदि वारन्ट आलें पाऊल उचली झपाझपा ॥
बाबांचा हा दूत पातला, ऐशी वेळा गमउं नका ॥ १ ॥
नाहीं राहिला वेळ तो मुळीं, । सत्वरी चला मजसवें तुम्ही ॥
मंडळी तुझी वाट पाहते । जेंवि लेंकरा माय बाप ते ॥ २ ॥
निघाले त्वरें सत्वरीं माय ताता ।
त्वरें गांठली गाडी ती साईनाथा ॥ ३ ॥

रा. ब. तावडे यांच्या सत्यनारायणाच्या पूजेपुढें कीर्तन करीत असतां **बनुबाईचें कीर्तन श्रीसाईबाबांच्या समाधीपुढें व्हावें** असें माझ्या मनांत आलेंच होतें, व बनुबाईच्या मनांतही शिरडींत गेल्यापासून कीर्तन **समाधीपुढें** करावें असें फार घोळत होतें. तें मनस्वी पाऊस पाडून श्रीसाईबाबांनीं पूर्णपणें सिद्धीस नेलें.

शनिवारीं काला झाला. सर्वजण काला-प्रसाद घेऊन स्पेशल मोटरनें शिरडींतून १२॥ वाजतां निघून थेट मनमाडास नाव न लागतां त्याच मोटरींतून पोंहचलों व अलाहाबाद एक्स्प्रेसनें आम्ही २१ माणसें स्वतंत्र डब्यांत बसून थेट मुंबईपर्यंत साईबाबांनीं जणूंकाय रिझर्व्ह केलेल्या डब्यांतून आनंदाचा प्रवास संपवून शनिवारीं रात्रीं सर्व मंडळी घरच्या घरीं आलों.

**॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥**

वरीलप्रमाणें रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान आपल्या लेखांत लिहितात:

श्री. बनूबाईविषयीं "**आधुनिक मिराबाई**" या नांवाचा एक सुंदर लेख श्री. केशव सदाशिव केळकर यांनीं कांहीं वर्षांमागें छापून प्रसिद्ध केला आहे, तो जिज्ञासूंनीं जरूर अवलोकनांत घ्यावा.

**रा. आ. तर्खड**

श्रीनारायणायनमः

# श्रीसद्गुरु साईनाथ यांनीं दाखविलेला सत्तावीस मिनिटांचा चमत्कार

( चा. राजहंस माझा निजला )

श्री सद्गुरु साइनाथा किति अघटित तुमची सत्ता ॥ ध्रु० ॥

कीर्तनांत भक्तीरस तो पाहुनी चित्त बहु धालें ॥
गुरुभक्त प्रधानांचें तें प्रेमही मनीं बहु ठसलें ॥
शिर्डीस रंग हा यावा मनिं विचार ऐसे आले ॥
लागली मना तळमळ ॥
येइना झोंप बहु वेळ ॥
कधिं उगवे प्रातःकाळ ॥
लागला ध्यास हा चित्ता किती अघटित तुमची सत्ता ॥१॥

रविवारीं सायकाळा घातली चिठ्ठि ती नाथा ॥
भेटेल काय बनुबाई म्हातार्‍याच्या गृहिं आतां ॥
जाहली तया क्षणिं आज्ञा वाटला हर्ष बहु चित्ता ॥

---

१ सत्तावीस ( मिनिटें ) या शब्दांतील पूर्वार्ध फार महत्त्वाचा आहे.

२ रा. ब. तावडे यांच्या घरीं शनिवार ता. २१-७-३४ रात्रीं बनुबाईंनीं कीर्तन केलें.

३ श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त रा. ब. मोरेश्वरराव प्रधान.

आनंदाच्या वेगानें ॥
गांठली गाडि दासानें ॥
चालती पदहि जलदीनें ॥
गर्जेले मंडळिस बघतां किति अघटित तुमची सत्ता ॥२॥
मग विचार प्रगटित केले शिर्डीस नेउंया यांना ॥
गुरुपौर्णिमेस कीं आम्हीं सेवाया साई चरणां ॥
हा विचार सकलां ठसला बोलवा म्हणति मग नाना ॥
पत्रेंही लिहिलीं तीन ॥
गाडीचि वेळ ठरवून ॥
साईंचे गाती गुण ॥
हें सूत्र तूंचि हालविता किती अघटित तुमची सत्ता ॥३॥
भेटे वडिलां वनुबाई सकलांचा निरोप घ्याया ॥
धाडिलें पत्र गुरुराया कीं कृपा असोंद्या सदया ॥
जाहली सकल तय्यारी खरिदल्या वस्तु सर्वे न्याया ॥
परि आप्त मंडळी कथिती ॥
अपशकून शिंका होती ॥
घातली चिठ्ठी देवा ती ॥
नको जाउं हुकुंम ये हाता किति अघटित तुमची सत्ता ॥४॥

---

४ बाबासाहेब यांच्या घरीं वनुबाई वगैरे मंडळीस पाहतांच प्रधानांस आनंद झाला.
५ श्रीसाईबाबांचे भक्त श्री. प. प. नारायणाश्रमवासी ( ना. म. ठोसर )
६ घरोतील मंडळी.
७ अशी चिठ्ठी.

पारडें असें हें फिरतां चेत तो रहित कीं झाला ॥
ऐकुनी अशी ही वार्ता दाजींचा धीरहि खचला ॥
मग खिन्न मनानें सारे टेकिती अंग भूमीला ॥
निद्रेचा नलगे सूर ॥
माजलें हृदयिं काहूर ॥
सेवेची मनिं हुरहूर ॥
जावें किं न जावें आतां, किती अघटित तुमची सत्ता ॥५॥
जे वीर रणांगणि शिरतां मागें न कदापी सरती ॥
सद्भक्त तैसा वागे दे शीर काढुनी हातीं ॥
सद्भक्त तसा दाता कीं वीरही शोभतो जगतीं ॥
आम्हांस पाहिजे गेलें ॥
हे विचार मनिं उद्भवले ॥
तों भूत आडवें आलें ॥
शंकाचें भ्रमवी चित्ता किती अघटित तुमची सत्ता ॥६॥
मग पहांट समयीं उठली मंडळी कांहिं ती निजली ॥
कोणास स्वप्नही नाहीं झोंपही कुणा नच आली ॥
घेऊन निरोपा दाजी उतरले मंद पाउलीं ॥
गाडींत जाउनी कथिती ॥
मंडळी कुणी नच येती ॥
ऐकतां धडकली छाती ॥
कीं काय करावें आतां किती अघटित तुमची सत्ता ॥७॥

ऐकुनी वृत्त दार्जींचें म्हातारा घडयाळ पाही ॥
दाजीस लोटुनी सांगे त्यां घेउनि ये लवलाही ॥
"चिंता न करी" म्हण कसली संतांचा आश्रय पाही ॥
सत्ताविस मिनिटें उरलीं ॥
मोटार गांठितां वहिली ॥
तों दासें उदि लावीली ॥
मोटार चालु ती होतां किती अघटित तुमची सत्ता ॥८॥

मंडळी झोंपली होती यनुबाई आदी करून ॥
"चलगो यनु" म्हणती दाजी दारांत उभे राहून ॥
तों धडपड करुनी उठली सामान घेति उचलून ॥
बिस्तरा शिरावरि घेती ॥
वाहणा कुणाच्या हातीं ॥
धेंड वस्त्रें अंगीं नसती ॥
धांजली चूळहि न भरतां किति अघटित तुमची सत्ता ॥९॥

दश मिनिटें अवघीं उरलीं वेगानें मोटर वळली ॥
इकडची घाबरुनि गेली मंडळी मनामध्यें गळली ॥

१ श्रीसाईबाबांचे प्रेमळ भक्त दाजी सांबारे.

२ बाबासाहेब तर्खड.

३ श्री. वसंतराव गोरक्षकर यांनीं मोटर चालू होतांच बाबांचें स्मरण करून मोटरीस उदी लावली.

४ अंगावरील वस्त्रें अर्धवट नेसलेल्या स्थितींत.

५ बोरीबंदरवर बाबासाहेब आदिकरून सर्व मंडळी.

मोटार थांबतां सारीं वेगानें धांवति झालीं ॥
तिकिटेंहि मिळालीं हातीं ॥
घिनसायासें झटपट तीं
धांवतां धडधडे छाती ॥
अवकाश गाडिला नव्हता किति अघटित तुमची सत्ता॥१०॥

अर्धें जों मिनीट उरलें " मंडळी पाहती झाली " ॥
आनंदें म्हणती सारे " मंडळी आलि रे आली "
शेवटचा माणुस चढतां गाडीही चालू झाली ॥
पाहूनी साइची लीला ॥
समुदाय थक्कची झाला ॥
भक्तांचा वारा सुटला ॥
धन्य धन्य साइनाथा किति अघटीत तुमची सत्ता ॥ ११ ॥

चालली एकची चर्चा ती सत्ताविस मिनिटांची ॥
पाहुनी कृती सांईची जी जगतीं अघटित साची ॥
रंगले भक्तिरंगानें गाती लीला साईची ॥
कृति अघटित तुमची बाबा ॥
ब्रंह्मांडीं तुमचा ताबा ॥
तूं चैतन्याचा गाभा ॥
या ठाव पदांबुजिं आतां किती अघटित तुमची सत्ता।१२।

१ गाडीला वेळ अगदीच थोडा होता म्हणून सर्व धांवत सुटली.

कीर्तनांत भक्ती बघुनी श्रीसाई प्रसन्न झाले ॥
श्वानाचें रुप दाउनी भक्तांतें दर्शनं दिधलें ॥
मस्तकीं हस्त ठेवोनी भक्तांत चित्त रंगविलें ॥
किति वर्णूं साईलीला ॥
आकळे न मंद मतीला
परि नम्र विष्णुदासाला ॥
द्या भजन सौख्य तें आतां श्रीसद्गुरु साईनाथा ॥ १३ ॥

एक साईभक्त

१ शिर्डीत श्रीसाईबाबांच्या मशिदीत गुरुवारीं ता. २६-७-३४ रात्रीं आणि शुक्रवारीं रात्रीं समाधीसमोर श्रीगुरुभक्त बनुबाईंनीं फारच प्रेमळ कीर्तन केलें, तें ऐकून सर्वच भक्तगणांस आनंद झाला.

२ कीर्तनांत "बाबा सध्या इथें आहेत" असें वाक्य उच्चारल्याबरोबर एक कुत्रा मंडळींत येऊन उभा राहिला आणि लगेच बनुबाईकडे बघून निघून गेला.

३ खोलीचे सर्व दरवाजे बंद असतां पहाटे काकड आरतीच्यावेळीं बनुबाईच्या उशाशीं एक मोठा कुत्रा बसून होता; थोड्या वेळानें निघून गेला.

# उंच स्वरानें भगवन्नाम उच्चारण्यांत होणारे लाभ

## एका अनुभवी संताचा उपदेश

अनुवादक " वासुदेवशर्मा "

**पहिला लाभः**—भगवन्नामाचा जोरानें उच्चार करून भजन-कीर्तन केल्यानें अंतःकरणांत भगवत्प्रेम उत्पन्न होतें. नामसंकीर्तनाचा महिमाच असा आहे. **" कलौ केशवकीर्तनात् "** गोस्वामी श्रीतुलसीदास आपल्या 'विनयपत्रिका' नांवाच्या ग्रंथांत लिहितातः—

**राम राम रटु, राम राम रटु, राम राम जपु जीहा ।**
**नामनाम–नवनेह–मेहको, मन ! हठि होहि पपीहा ॥१॥**
**सब साधन-फल कूप-सरित-सर-सागर-सलिल-निरासा ।**
**रामनाम-रति-स्वाति-सुधा-सुभ-सीकर प्रेमपियासा ॥ २ ॥**

**यांतील 'रटु' हा शब्द उंच स्वराचा बोधक आहे.**

**भावार्थः**—हे जिव्हे, तूं सदा उंचस्वरानें रामनामाचा उच्चार कर. त्याचा जप कर आणि त्यांतच रमून राहा; हे मना, तूं पण रामनामांतून, नित्य नव्या प्रेमप्राप्तीसाठीं हट्ट धरून चातक बनून जा; चातक जसा विहिरी, नद्या, तलाव, आणि सागर यांतील कोणच्याही पाण्याची आशा न करतां, केवळ स्वातिनक्षत्रांतील पडणाऱ्या जलाच्या एका प्रेमबिंदूसाठींच तान्हेलेला राहत असतो, तसा तूंही इतर सर्व साधनें व त्यांच्या फलाची आशा न करतां, केवळ श्रीरामनामाच्या प्रेमरूपि अमृतबिंदुमध्यें प्रीति कर.

**दुसरा लाभः**—उंच स्वरानें भगवद्भजन करीत असतां, मनाला संकल्प-विकल्प उत्पन्न करण्यांत अडथळा उत्पन्न होत असतो. त्याला महर्षि वाल्मीकीच प्रमाण आहेत. " कूजन्तं राम रामेति मधुरं मधुराक्षरम्। आरुह्य कविता शाखां वन्दे वाल्मीकि कोकिलम् ॥ "

**तिसरा लाभः**—उंच स्वरानें रामनामाचा उच्चार करीत असतां " राम " हीं दोनच अक्षरें आपल्या कानीं पडत असतात, आणि दुसरा शब्द कानांत जाण्याला तीं प्रतिबद्धक होतात. त्यामुळें केवळ 'राम-नाम' हेंच श्रवणेंद्रियाचा विषय होऊन, तेंच ऐकण्याचा अभ्यास मनाला लागून राहतो, आणि दुसरा शब्द कानीं पडल्यास व्याकुळता उत्पन्न होते, व त्यामुळें एकांतांत राहणें आवडूं लागतें.

**चौथा लाभः**—रामनामाचें उंच स्वरानें भजन केलें असतां 'राम' हा शब्द आसमंतात-भागीं प्रतिनादित होऊन राहत असतो; तो इतका कीं, भजक निद्रावश झाल्यावरही कित्येक तासपर्यंत कर्णद्वारें त्याचा ध्वनि त्यास ऐकूं येत असतो. हा दिग्ध्वनि बंद पडतांच भजक आपोआप उठून जागा होतो, आणि पुनः रामनामाचा उंच स्वरानें उच्चार करूं लागतांच पूर्ववत दिग्ध्वनि आसमंतात् पसरून राहतो. यासंबंधीं एक उदाहरण देतां येतें. कुंभार घडा बनवीत असतां त्यानें चाकावरील दंड काढून घेतला तरी चाक फिरत राहत असतें, व तें फिरण्याचें बंद होत आहे असें दिसतांच तो दांड्यानें पुनः त्याला गति देतो, त्यामुळें त्याचें चक्र सारखें फिरत राहत असतें. तद्वत भजकाच्या आसमंतातभागीं रामनामाचा ध्वनि दुमदुमून राहत असतो. अशा पवित्रतम वातावरणामध्यें साधकाला आपोआप तीव्र वैराग्य

प्राप्त होतें, आणि त्याला ब्रह्म लोकापर्यंत सर्व वस्तुजात तृणवत् वाटूं लागते, ही अनुभव सिद्ध गोष्ट आहे.

**पांचवा लाभः**— अशा रीतीनें उंच स्वरानें भजन करीत असतां, वाणीला अशी सवय पडून जाते कीं, मन कुठेंही राहो, वाणीकडून भगवन्नामाचा उच्चार आपोआप होत राहत असतो.

वरील पांच प्रकारचे लाभ उंच स्वरानें भगवद्भजन करणाऱ्यास प्राप्त होत असतात, म्हणून भगवन्नामोच्चार उंच आवाजानें करणें उचित होय हें साधकानें जाणून असावें.

स्वतः भजन करीत असतां किंवा कीर्तनांत भजनप्रसंगीं, कित्येक आनंदानें नाचत असलेले पाहण्यांत येतात. हा नर्तनाचा प्रकार कित्येकांना चमत्कारिक वाटतो, म्हणजे तो नसावा असें त्यांना वाटतें, असें वाटणारे गृहस्थ देवभक्तही असतात. यासंबंधीं ज्ञानेश्वर महाराज काय म्हणतात तें खालीं देतों. सततं कीर्तयंत....ह्या भगवद्गीतेंतील श्लोकाचें द्धरत महाराज असें सांगातात:—

तरी किर्तनाचेनि **नटनाचें**।नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचें । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ ऐसें माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमीत भरलें ॥ जयाचे यांचे-पुढां भोजें। **अखंड नाम नाचत असे** माझें । जें जन्मसहस्रीं वोळ-गिजे । एक वेळ यावया ॥ तो मी वैकुंठीं नसें । वेळ एक भानुबिंबींही न दिसें । वरी योगियाचींहि मानसें । उमरडोनि जाय ॥ परी तयांपाशीं

पांडवा । **मी हरपला गिंवसावा** । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥

कीर्तना–भक्तींत–कीर्तनप्रसंगीं–नलाप्रमाणें (पायांत चाळ बांधून) थै थै नाचून भगवद्भजन करण्याची प्रथा फार प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. महासाध्वी मिराबाई अशा नटनाचानेंच उद्धरून गेल्या आहेत. गेल्या गुरुपौर्णिमेच्या श्रीशिरडी येथील उत्सवांत, ननूताईच्या कीर्तनप्रसंगीं अशा नटनाचाचा थोडासा अनुभव तिकडे गेलेल्या मंडळीस आला असेल.

## श्रीसाईनाथप्रसन्न

कृतानेक सा. नमस्कार विनंती विशेष. खालील अनुभवास साई-लीला-मासिकांत स्थळ द्याल अशी आशा करितों :—

चिरंजीव पद्माकर हा सीक झाल्या वेळीं तो श्रीसाईबाबा यांच्या उदीमुळें कसा बरा झाला याजबद्दलचा अनुभव शके १८५४ सालच्या आश्विन महिन्याच्या ७ व्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे :—

१. त्याचप्रमाणें सन १९३२ सालच्या नवेंबर महिन्यांत चि. मोरेश्वर व डिसेंबर महिन्यांत चि. नारायण हे कृमी-वातानें आजारीं पडले होते. उभयतांचा ताप अनुक्रमें २१ व २५ दिवसांनीं निघाला. प्रथम ताप ५ पर्यंत झाला होता. कफही झाला होता. उभयतांना औषधोपचार चालू होते. आमच्या नेहमींच्या श्रद्धेप्रमाणें मनांत साईबाबाचें चिंतन करणें व त्यांची मुलांस बरें करण्याबद्दल विनवणी करणें, त्याचप्रमाणें मुलांस उदी लावणें व उदी पाण्यांतून अगर औषधांत घालून देत जाणें हा क्रम पहिल्यापासून चालला होता. तापाच्या मुदती जसजशा वाढत चालल्या, तसतशी मुलांच्या प्रकृतीची धास्ती वाटत होती; परंतु शेवटीं तापाच्या वरील मुदतीनंतर दोन्हीं मुलांचे ताप वगैरे कमी कमी होत जाऊन मुलगे बरे झाले. याही वेळेस मुलगे बरे झाल्यावर अनुभव प्रसिद्धीकरितां पाठवीन असें श्रीसाईबाबा यांस कबूल केलें होतें. परंतु आज-उद्यां करतां करतां बरेच दिवस निघून गेले; यामुळें एकंदर हकीकत जशीच्या तशी खुलासेवार लिहितां आली नाहीं, त्याजबद्दलची माफी असावी. परंतु श्रीसाईबाबा व त्यांची उदी यांच्यावर श्रद्धा ठेवल्यामुळेंच मुलगे बरे झाले यांत शंका नाहीं.

२. त्याचप्रमाणें मजला माझ्या नोकरीसंबंधानें कांहीं अडचण वगैरे भासल्यास मी नेहमीं श्रीसाईबाबांचा धांवा करितों व तो आपल्या कृपेनें माझी अडचण दूर करितो :—

३. तारीख १८।१।३४ रोजीं संध्याकाळीं मी वांती सुरू होऊन सीक झालों, तेव्हांही मी श्रीसाईबाबांची उदी घेत राहिलों होतों. पहाटेच्या सुमारास वांती कमी पडली व पुन्हा थोडथोडी ५।६ दिवसपर्यंत होतच होती; उदी मी मधून मधून घेत असें. औषध पोटांत मुळींच राहत नसे. ह्या सीकपणांतच तारीख २७।१।३४ रोजीं माझ्या पोटांत एक लहानशी गांठ लागूं लागली; पुढें मी रजा घेऊन घरीं गेलों. दुसऱ्या दिवशीं गांठ मोठी वाढत चालली; तेव्हां पोटांत कांहीं तरी दुखणें होणार व ही गांठ वाढत जाऊन पिकून पोटांत फुटणार अगर ऑपरेशन करावें लागणार, अशा अनेक कल्पना वाटून मला माझ्या जीविताची धास्ती वाटून माझ्या मुलाबाळांचे माझ्या मृत्यूमुळें कसकसे हाल होतील, शिक्षण वगैरे कसें अपुरें राहील, असे अनेक विचार मनांत येत होते. परंतु दुखण्यावर उदी लावणें व पाण्यांत घालून पिणें सुरूच ठेवलें होतें. यामुळें तिसऱ्या दिवशीं गांठ कमी होऊन मला बरें वाटलें. दिवसेंदिवस गांठ कमीकमी होत जाऊन आतां मला बरें वाटत आहे. अद्याप थोडासा अंश आहे. तो श्रीबाबांच्या कृपेनें नाहींसा होईल अशी मला आशा वाटत आहे. वरील हकीकतीवरून माझ्यावर किती मोठें संकट आलें होतें, व तें श्रीसाईबाबांच्या उदीमुळें कसें पार पडलें याची कल्पना साईभक्तांना होईल.

४. गेल्या डिसेंबर १९३३ महांत माझे मित्र भगवान बाबर झाईवाले ( तलाठी ) हे पालघरहून त्यांच्या घरीं गेले होते. तेथें त्यांची सोन्याची आंगठी पडली. त्यांनीं आंगठीचा शोध बराच केला, परंतु आंगठी मुळींच सांपडत नाहीं. यावरून आंगठी या ठिकाणीं पडली नसून पालघर येथें आपल्या बिऱ्हाडीं पडली असेल अशी कल्पना करून ते झाई येथून पालघर येथें आले व त्यांस अनुभव माहित असल्यामुळें प्रथम त्यांच्या खोलींत न जातां त्यांनीं माझ्या खोलींत येऊन श्रीसाईबाबांच्या तसबिरीपुढें उभें राहून हात जोडून जर माझी आंगठी सांपडली तर मी आपल्या

नांवानें दोन नारळ फोडीन असें सांगितलें व नंतर त्यांनीं त्यांची खोली उघडून खोलींत बराच तपास केला. परंतु आंगठी सांपडली नाहीं. तेव्हां ते निराश होऊन परत आपल्या घरीं झाई येथें गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं पुन्हा शोध करण्यास सुरवात केली. त्यांनीं प्रथम तपास करतांना आंगठी याच ठिकाणीं पडली असेल असें समजून ज्या ठिकाणीं जास्त बारकाईनें व जास्त वेळां तपास केला होता, त्याच ठिकाणीं त्यांस आंगठी ताबडतोब व अगदीं उघड्या जागीं सांपडली. तेव्हां त्यांस साईबाबांच्या कृपेमुळेंच आंगठी सांपडली अशी खात्री झाली व त्यांनीं पालघर येथें आल्यावर श्रीसाईबाबांच्या तसबिरीसमोर दोन नारळ फोडले. वरील मजकूर त्यांनीं मला सांगितल्याप्रमाणें अनुभव म्हणून प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें. तरी कृपा करून जागा द्याल अशी आशा करितों.

यावरून श्रीसाईबाबा व त्यांची उदी यांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेविल्या-मुळें संकटें कशीं नाहीशीं झालीं, हें दिसून येईल. किती अनंत उपकार श्रीसाईबाबांचे ! धन्य त्यांच्या अगाध लीलेची !

पालघर
ता. ५।३।३४

आपला चरणरज
यादव विठ्ठल म्हात्रे, तलाठी

# श्रीसाईबाबा
# ज्ञानाचे कण

मनुष्याच्या अंतःकरणांत सदिच्छा दृढतर उत्पन्न झाली, कीं परमेश्वर मनोरथ कोठून ना कोठून तरी साधनें देऊन पूर्ण करतोच.

सुखापाठीमागून दुःख, आणि दुःखापाठीमागून सुख हें रहाटगाडगें अक्षयीं चालूच आहे.

प्रसंगाला दूरचा असो कीं जवळचा असो, स्वकीय असो कीं परकीय असो, मदत करील, तोच बंधु खरा.

"आंधळयाच्या गायी देव राखणार" ह्या म्हणीप्रमाणें सत्कार्याविषयीं ज्याचा दृढनिश्चय असतो, व परमेश्वरावर ज्याचा भरंवसा असतो, त्याची देव कधींच उपेक्षा करीत नाहीं.

"स्त्रियांनीं घरांतील कामकाज नीट रीतीनें केलें व गृहिणींचीं कर्तव्यें योग्य रीतीनें पाळलीं, म्हणजे आपोआपच त्यापासून मुक्ति मिळते"

—स्वामी विवेकानंद

बेत करणें हें मनुष्याचें काम आणि तो सिद्धीस नेणें हें परमेश्वराचें काम आहे.

अमुक एक सुधारणा करून आपण समाजाला दुःखमुक्त केलें असा समज धरणें गैर आहे. समुद्राची लाट एका बाजूनें उचलली, तर दुसऱ्या बाजूनें खोलगा पडतो, तशीच जगाची स्थिति आहे. ह्यारितां अभिमान सोडून नेहमीं आपल्या कर्तव्याची जागृति राखावी. —स्वामी विवेकानंद

"वसुधैव कुटुम्बकम्" अशी ज्याची वृत्ति बनून गेली, त्याला इष्टआप्त नाहीत असें स्थळ असणार कोणतें ?

मुंबई, ता. १५।६।३४

साईसेवक

# श्रीशंकर

## श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणि श्रीसाईबाबामहाराज सं. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांच्या श्रीरामनवमीच्या उत्सवाचा अहवाल.

या साली आलेली जमा व झालेला खर्च याचा तपशीलवार खर्डा पोटीं आहे. यंदाच्या सालीं उत्सवाकरितां नांदेड, मुखेड, गव्हाण, माशोड, कळमनुरी, मुंबई, पुणें, अंधेरी, वांद्रा, इंदोर, खामगांव, पंढरपूर, नगर, उमरी, गुंटकल, सांताक्रूझ, कुर्ला, ठाणा, कल्याण खार, अकोला, भुसावळ, उमरावती, वगैरे ठिकाणाहून बरेचसे लोक आले होते; नेहमीं येणाऱ्यांपैकीं गोविंद व्यंकटी महाजन, मुखेड यांची आयुर्मर्यादा संपल्यामुळें ते या सालीं कालवश झाले; पण त्यांची जागा मुखेड येथील श्री. गोविंदराव पानशोडीकर, चिनैया मुकावार, मारुति फत्तेवार, वगैरे मंडळींनीं महाजन हे गेल्याची आठवण होऊं दिली नाहीं. पापालाल उमरीकर हा दिवस डावा झाल्यामुळें मागच्या सालापासून मुळींच येत नाहींत.

असो. उत्सवास आरंभ चैत्र शु. ८ पासून झाला व द्वादशीस श्रीगोपालकाला होऊन रामनवमीच्या उत्सवाची समाप्ति झाली. पांचसहा हजार पान झालें. चालू सालीं यात्रेच्या निमित्तानें सर्व प्रकारचीं मिळून शंभर-एक दुकानें आलीं होतीं. यात्रेचा बंदोबस्त सरकारचे तालुकाधिकारी यांनीं उत्तम ठेवला होता; स्वतः कोपरगांवचे मामलेदारसाहेब व राहत्याचे फौजदारसाहेब हजर होते; यामुळें यात्रेंत चोऱ्या, मारामाऱ्या वगैरे कांहीं झाल्या नाहींत. पिण्याच्या पाण्याचें आरोग्यरक्षणासाठीं यात्रेच्या आधीं सरकारकडून आलेलें औषध पाण्यांत टाकण्यांत आलें होतें, त्यामुळें यात्रा निर्विघ्न पार पडली.

या उत्सवांत यंदाच्या सालीं रामनवमी दिवशीं गांवच्या सर्व लोकांनीं आपआपल्या घरचा एकेक माणूस पाठवून आठ मैलांवर असलेल्या श्रीगोदा-

वरी-गंगेच्या कावडी भरून श्रीसाईमहाराजांच्या समाधीस वाळण्याकरितां मोठया थाटानें आणल्या. कोणी कावडीला निशाणें लावलीं होतीं; कोणी घागरमाळा बांधल्या होत्या; हा गांववाल्यांचा अपूर्व उत्साह पाहून प्रेक्षक-जनाचें मन आनंदानें भरून प्रत्येकाच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहत होते; कावडी आणण्याकरितां गांवचे लोक चैत्र शु० ८ च्या दिवशीं रात्रीं ९ वाजतां कोपरगांवास रवाना झाले व अरुणोदयाला सुरवात होऊन प्रत्येकानें श्रीगोदावरीच्या जलाची कावड भरून खांद्यावर घेऊन भजन करीत सूर्योदयाला शिर्डीगांवच्या शिवेपाशीं येऊन दाखल झाले. कावडीची संख्या सुमारें शंभर होती. गांववाल्यांनीं कावडीस समोरें जाऊन बँड, ताशा, टाळ, मृदंगवाजंत्रीं, डफ, शिंग वगैरे लावून कावडी गांवांत आणल्या. कावडीच्या मिरवणुकीच्या रस्त्यानें लोकांनीं सडे-रांगोळ्या घातल्या होत्या; अशा मोठया थाटानें गांवांतून कावडींचो मिरवणूक निघाली. लोकांनीं कावडीवर फुटाणें, लहाया, फुलें उधळलीं. कावडीच्या मिरवणुकीचा कार्यक्रम पुरा होऊन कावडी श्रींच्या मंदिरांत आल्या, व मग श्री. बाळासाहेब देव ( सं. क. ट्रस्टी ) यांनीं आलेल्या गंगाबाईच्या कावडीची यथासांग शोडषोपचारें पूजा केली; नंतर प्रत्येकानें आपल्या कावडीतील थोडें पाणी महाराजांच्या समाधीस घालून राहिलेलें पाणी अभिषेकासाठीं जवळ ठेव-लेल्या पंचपात्रांत घातलें व थोडें पाणी गांवांतल्या सर्व दैवतेला घातलें. कावडी अणणारांस श्रीसाईमहाराजाच्या उत्सवकमिटींतून प्रसाद म्हणून एक नारळ व जेवण देण्यांत आलें व सर्वांनीं महाराजांपुढें उभें राहून अशी प्रार्थना केली कीं, पुढच्या सालीं आमच्या गांवास पीकपाणी चांगलें झाल्यास हा कावडीचा उत्सव मोठया थाटानें दरसाल करूं. तरी श्रीसाईमहाराज या गांवच्या लोकांच्या विनंतीस मान देतील अशी आशा आहे.

उत्सवाच्या पांच दिवसांत बुंदी, शिरा, जिलबी, अशीं पक्वान्नें मनमुराद झालीं. कोठीचा बंदोबस्त गोविंद पानशोडीकर, वगैरे मुखेडकर मंडळींनीं

उत्तम ठेविला होता. पंक्ति वाढण्याचें काम राजेश्वर माझोडकर, जगन्नाथ मास्तर, अनंतराव शिंदगीकर, रामराव वरुडकर, रामराव दिग्रसकर, दत्तोपंत, प्रभाकर वगैरे मंडळींनीं चांगला ठेवला होता. यांच्या मदतीला बाळामहाराज, वासुदेव भंडार कवटे, बाबा धर्माधिकारी, बापाजी, नाना वगैरे मंडळी होती. यामुळें अन्नाची चोराचोरी झाली नाहीं.

रामनवमीच्या दिवशीं महाराजांच्या समाधीस व जवळच असलेल्या पादुकस प्रातःकाळीं गांववाल्यांच्या कावडीचें गंगास्नान झाल्यावर पवमान रुद्राचा अभिषेक झाला, अभिषेकास पुणतांबे, पंढरपूर, कोकमठाण, नगर, लिंवगाव वगैरे ठिकाणची भिक्षुक मंडळी आली होती. त्यानंतर दोनप्रहरीं श्रीरामजन्माचें कीर्तन झालें. अस्तमानी कावडींची व रथाची मिरवणूक निघाली. तिचा बंदोबंद तात्या पाटील, बामन पाटील, गबा सुतार वगैरे मंडळींनीं उत्तम ठेवला होता. रात्रीं गांवच्या मुसलमान लोकांनीं संदल काढून महाराजांच्या समाधीस चंदन चढविलें. त्यानंतर नेहमींप्रमाणें दारू उडविण्याचें काम झालें. चालू सालीं दारू यथातथाच झाली. चै. शु. दशमीच्या दिवशीं मल्लांच्या कुस्त्यांचा हगामा फार मोठ्या प्रमाणांत झाला. त्याचा बंदोबस्त तात्या पाटील, बयाजी पाटील, दगडू सोनार, नारायण लव्हार, नारायण शेळका, वगैरे मंडळींनीं केला. हगाम्याकरितां बक्षिसें वांटण्यासाठीं श्रीसाईमहाराजांच्या यात्रेंत जे पांच दिवसांत मिळून पेटींत रुपये ९३ आले ते व गांववाल्यांनीं कांहीं वर्गणी करून पैसे जमा केले होते तें, असे मिळून बक्षिसें वांटलीं. उत्सवाच्या चिट्या व आमंत्रणपत्रिका पाठविण्याचें काम संस्थेचे सेक्रेटरी सुंदरराव दि. नवलकर यांनीं फार उत्तम तऱ्हेनें केलें. त्यांच्या कोणत्याही कामाची शिस्त फार चांगली असते व असले होतकरू उत्साही सेक्रेटरी संस्थानास लाभले, ही श्रीसाईबाबांची कृपाच होय. एकादशीच्या दिवशीं श्रींच्या पालखीची मिरवणूक निघून भजन, गारुड, वगैरे झालें. शिरवळकरबुवांनीं फार चांगले अभंग

म्हटले. द्वादशीस श्रीगोपाळकाला होऊन उत्सव समाप्त झाला व लो
प्रसाद घेऊन आपआपल्या गांवाकडे रवाना झाले.

तसेंच भक्तजनांना रामनवमीचा प्रसाद टपालमार्गानें बाळा पिला
गुरव यांच्यामार्फत रवाना झाला. पुढें हनुमानजयंति होऊन श्रीरामनव
मीच्या उत्सवाची समाप्ति झाली. हनुमानजयंतीच्या दिवशीं महार, मांग, भिल्ल
चांभार, वडारी वगैरे लोकांस गोड शिऱ्याचे जेवण दिलें. या पांच दिवसां
आलेल्या पाहुण्यांच्या आदरातिथ्यासाठीं श्री. बापूराव रावोजी बोरावके म्हा
प्रे. लो. बो. नि. नगर यानें आपल्या बागेंतील चिकू, मुसंबी, ऊस, र
देऊन सत्कार केला. अशा तऱ्हेनें उत्सव पार पडला.

येणेंप्रमाणें असलेली हकीकत चरणीं सादर केली आहे. या उत्स
वास ज्यांनीं ज्यांनीं द्रव्यसहाय्य केलें व उत्सवास हजर राहून अंगमेहनत
केली, त्यांच्या त्यांच्या मुलांबाळांचें, त्यांच्या इभ्रतीचें, आरोग्याचें समर्थांनी
कृपाकटाक्षांनीं अवलोकन करून रक्षण करावें, आम्ही उत्सवास आलेले
लोक महाराजांचीं लेकरें आहोंत, तेव्हां लेकरांचे रक्षण आईनेंच केलें
पाहिजे. उत्सवांत आमच्या हातून जाणून-न जाणून ज्या कांहीं चुका व
अपराध विकारवश होऊन झाले असतील, त्यांची महाराजांनीं अत्यंत कृपाळू
होऊन क्षमा करावी, अशी सर्वांच्या तर्फे मी आपल्या पवित्र चरणापाशीं
नम्र विनंती करीत आहें. अशीच सालोसाल दासाच्या हातून सेवा घेत
जावी; सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

सकलसंतचरणरज,

धामणगणू

# अनुभव

## श्रीसाईबाबा प्रसन्न

## बाबांच्या उदीचा महिमा

मी २५-१२-१९३४ रोजीं माझे नातेवाईक श्री. रघुनाथ त्र्यंबक गिरधर मु॥ अंधेरी (ठाणा) यांच्यां येथें गेलों होतों. त्या वेळेस साहजिक गोष्टीवरून गोष्ट निघाली कीं, मला रात्रीं स्वप्नांत एक बाई दररोज घाबरवते. तेव्हां त्यांनीं मला बाबांच्या उदीच्या महिम्याचे कांहीं दृष्टांत सांगितले व मला म्हणाले कीं, आज रात्रीं " बाबांची उदी " झोंपतांना उशाखालीं ठेऊन झोंप म्हणजे कोणीं तुला घाबरविणार नाहीं किंवा कांहीं होणार नाहीं. तेव्हां त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी झोपतांना " श्रीसाईबाबांची उदी" उशाखालीं ठेऊन झोपलों, त्या रात्रीं मला ती बाई तर दिसली नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या रात्रीं मला कोणत्याही प्रकारचें स्वप्न देखील पडलें नाहीं. हा मला बाबांच्या उदीचा पहिला अनुभव. त्याचप्रमाणे आणखी जे अनुभव आले आहेत ते खालीं देत आहें.

## उदीचा २ रा अनुभव

मी तारीख ६-३-१९३४ रोजीं माझ्या कांहीं कामास्तव मुंबईस गेलों होतों. तेथून मीं अंधेरीस येण्याकरितां ८॥ वाजतां निघालों. तोंच मला माझे मुंबईचे खोताच्या वाडींत राहणारे एक नातेवाईक रस्त्यांत भेटले व ते मला म्हणाले कीं, माझ्याबरोबर आमच्या घरीं चला व तेथून परभारें अंधेरीस जा. त्यांच्या जास्त आग्रहामुळें मला त्यांच्या घरीं जाणें भाग पडलें. तेथें मला विंचवानें दोन्हीं पायांस दंश केला. त्या वेळेस घरामध्यें पुरुषमंडळी नसल्यामुळें सर्वांस काय उपचार करावा याचा विचार पडला व मी देखील गांगरून गेलों; तोंच मला माझे अंधेरीचे नातेवाईक श्री. र. त्र्यं. गिरधर यांनीं दिलेल्या श्रीबाबांच्या उदीचें स्मरण झालें. त्या उदीपैकीं मीं थोडीशी भक्षिली व थोडी दंशावर लावली. तोंच दंशावर होणारी भयंकर आग थोडीशी कमी झाली. म्हणून थोडीशी उदी पुन्हा भक्षण केली व बिछान्यावर साहाजिक पडलों. तोंच झोंप लागली व सकाळीं जागा झालों तों वीष उतरलेलें आढळून आलें.

## उदीचा ३ रा अनुभव

माझा मित्र श्री. कृष्णराव बळवंतराव म्हसकर मु॥ उंबरगांव (ठाणें) यांच्या येथें रा. रा. गोपीनाथ विश्वनाथ जंगम (मु॥ तोंडसू कुलाबा) हे आले होते. त्यांना दररोज रात्रीं ३॥ वाजेपर्यंत झोंप लागत नसे. तेव्हां त्यांना मी "श्रीबाबांची उदी" दिली व सांगितलें कीं, तुम्ही रात्रीं झोपतांना ह्यांतील थोडीशी उदी दररोज भक्षण करा व बाकीची उशाखालीं ठेवा, व बाबांना म्हणा कीं, मला झोंप लागूं द्या. त्याप्रमाणें त्यांनीं केलें व रात्रीं ११ वाजतां बिछान्यावर पडले तोंच त्यांना झोंप लागली व सकाळीं ६ वाजतां जागे झाले. ते दुसऱ्या दिवशीं माझ्या घरीं आले व म्हणाले कीं, श्रीबाबांच्या "उदीचा" मला गुण आला व आणखी उदी घेऊन गेले. त्यांचा तोच कार्यक्रम आजमितीपावेतों चालू आहे.

## उदीचा ४ था अनुभव

मी तारीख २-६-१९३४ रोजीं (मु॥ वडवली (ठाणा) आमचे शेतावर गेलों होतों. दुसऱ्या दिवशीं रात्रींचें जेवण आटोपल्यानंतर मी व माझें कूळ लहानू धिमल (जात वारली) गोष्टी करीत बसलों होतों, तोंच एका बाईस विंचवानें दंश केल्याचें मला त्यानें सांगितलें; तेव्हां त्यांस मी सांगितलें कीं, भिण्याचें कांहींएक कारण नाहीं. माझ्याजवळ औषध आहे. मी "श्रीसाईबाबांची उदी" घेऊन तेथें गेलों व त्या बाईस थोडीशी उदी भक्षण करावयास दिली व भक्षण करण्याच्या अगाऊ म्हणण्यास सांगितलें "बाबा, मला बरे करा." त्याप्रमाणें तिनें थोडीशी उदी भक्षण केली व थोडीशी दंशावर लावली व वरील शब्द उद्गारले; तोंच त्या बाईस भयंकर होणाऱ्या वेदना थांबल्या व ती झोंपी गेली; ती सकाळीं ७ वाजतां जागी झाली. ती सकाळीं पाणी भरण्याकरितां नदीवर जात असतांना मला भेटली, तेव्हां तिला मी विचारलें कीं, वीष अजून उतरलें किंवा नाहीं! तेव्हां ती बाई म्हणाली, वीष केव्हां उतरलें तें मला कळलें देखील नाहीं. त्याच दिवशीं माझ्याजवळ उदीच्या मागण्या बऱ्याच आल्या, परंतु उदी शिल्लक नसल्यामुळें त्यांना देतां आली नाहीं.

शांताराम हटकर
उंबरगांव, जि. ठाणे

## अनुभव

श्रीसाईलीलाकर्ते यांस नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे मु. डेक्कन जिमखाना, पुणें नंबर ४ यांचा कृ. सा. न. ता. ९ माहे एप्रिल सन १९३२ पावेतों श्रीकृपेंकरून सुखरूप असों वि. श्रीसाईलीला वर्ष ८ (शके १८५२) अंक ६, ( श्रावण ) ह्या अंकांतील पृष्ठें २६ ते २८ ह्यामध्यें श्रीनीं नाशिक येथील मुळेशास्त्री अग्निहोत्री यांना विश्वरूपदर्शनाचा मासला दाखविल्याची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे, तशा प्रकारच्या आळंदी येथील ब्रह्मीभूत श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज यांच्या अलौकिक तपःसामर्थ्याच्या कांहीं गोष्टी काल सायंकाळीं वृद्ध मित्र पूनाहायस्कूलचे माजी (पेन्शनर) हेड्मास्तर ( मुख्याध्यापक ) श्रीयुत परशुराम रावजीशास्त्री गोडबोले, बी. ए., यांज-कडून कळल्या; त्या साईलीलेंत प्रसिद्ध करण्यास्तव आपणांकडे लिहून पाठवीत आहें. कारण, " संतचरित्रें परम पवित्रें सादर परिसावीं" ह्या उप-देशाप्रमाणें ह्या गोष्टी आपल्या वाचकांना कळविणें हें मीं आपलें कर्तव्य समजतों.

( १ ) श्री. रावजीशास्त्री यांचा तिसरा मुलगा व मित्र श्री. परशुरामपंत यांचा धाकटा भाऊ हा जन्मतःच कांहीं कंठदोषामुळें जरी मुका होता, तरी त्याला चांगलें ऐकूं येत असल्यामुळें त्याला सहजच स्वभाषाज्ञान चांगलें झालें होतें. पुढें त्या मुलाच्या व्रतबंधाचा समय आला. तेव्हां त्याला शास्त्रीबोवांनी आळंदीस नेऊन त्याचें व्यंग तेव्हां स्वामी-महाराजांना निवेदन केलें, तेव्हां ते हंसून म्हणाले कीं, " हा मुलगा मुळींच मुका नाहीं." आणि नंतर त्यांनीं त्याच्या पाठीवर हात फिरवून " **बाळा! ज्ञानोबा तुकाराम म्हण!**" असें त्याला सांगितल्या-बरोबर तो तसें स्पष्ट म्हणाला, व त्यासरशीं त्याला उत्तम वाचा फुटली!

( २ ) अव्वल इंग्रजी सत्तेंत मोरशास्त्री साठे या नांवाचे सर्व-शास्त्रविशारद एकपाठी असलेले अद्वितीय विद्वद्रत्न होते, व सुप्रसिद्ध कृष्ण-शास्त्री चिपळूणकर यांचे ते गुरु असून भिकूशास्त्री गोडबोले ह्यांनी त्या

विद्वद्दलापासून न्यायशास्त्राचें पूर्ण ज्ञान संपादन केलें असल्यामुळें श्री. भिकूशास्त्री यांची न्यायशास्त्रदिग्गज अशी ख्याति होती. हे भिकूशास्त्री रावजीशास्त्री यांचे वडील बंधु असून रावजीशास्त्री हे स्वामीमहाराजांचे भक्त असल्यामुळें ते दोघे बंधु एकदां आळंदी येथें गेले असतां तेथें स्वामी-महाराजांशीं भिकूशास्त्री यांचा न्यायशास्त्रासंबंधीं जो संवाद झाला, तो ऐकून पुण्यास परत आल्यावर रावजीशास्त्री यांना भिकूशास्त्री म्हणाले कीं, "अरे रावजी ! तूं मला आळंदीस नेऊन स्वामींच्याकडून माझी जी उत्तम फजिती करविलीस, त्याच्या योगानें माझा न्यायशास्त्रज्ञानाभिमान सर्वंथ नष्ट केलास!" अर्थात् स्वामीमहाराज हे भगवद्गीता. अध्याय ४. श्लोक ३४ ह्यांतील "ज्ञानिनस्तत्वदर्शिन:" ह्या उक्तीचें मूर्तिमंत उदाहरण होते !

( ३ ) एकदा रावजीशास्त्री यांच्या घरीं सायंकाळीं स्वामीमहाराज बसले असतांना त्यांनीं एकाएकीं रावजीशास्त्र्यांना चांगली बिछाइत तयार करण्याची आज्ञा केली, आणि ती तयार झाल्याबरोबर स्वामीमहाराज रस्त्यावरील दरवाजापाशीं जातात तोंच देव-मामलेदार यशवंतराव महा-राजांची स्वारी आकस्मिक गाडींतून उतरतांना जेव्हां रावजीशास्त्र्यांना दिसली, तेव्हां स्वामींच्या अतींद्रियज्ञानाविषयीं त्यांना मोठें कौतुक वाटलें.

( ४ ) आणखी एका प्रसंगीं स्वामीमहाराज आळंदीस असतांना त्यांनीं आपल्या सर्व शिष्यवर्गास ग्रामभोजनाची तयारी करावयास सांगून सर्व ग्रामस्थांना भोजनाचें निमंत्रण पाठविलें, आणि नंतर तयारीप्रमाणे ग्रामभोजनही झालें. परंतु ह्या अन्नशांतीचें प्रयोजन मात्र तेव्हां कोणासच कळलें नाहीं. नंतर दोनतीन दिवसांनीं ती अन्नशांति अक्कलकोट येथील स्वामींच्या समाधिकालानिमित्त होती, असें जेव्हां कळलें, तेव्हां तिच्या निमित्ताचा उलगडा झाला. अंतर्ज्ञानी संत असले चमत्कार मुद्दाम करीत नाहींत, हे त्यांच्या ज्ञानयोगपुण्यप्रभावानें सहज घडून येतात.

इति शम:

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

## श्रीशैलधि ( शिरडी ) संस्थानचें शके १८५४ सालचें आय-व्ययसह संक्षिप्त वृत्तांतकथन

१ या आहवालाच्या मुदतींत संस्थानकमिटीच्या श्रीशैलधि व सांताक्रूझ या दोन ठिकाणीं मिळून एकंदर १८ सभा झाल्या.

२ लेंडीबागेस लागून सरकारी मोफत नंबरची जागा आहे. त्यापैकीं सुमारें १०।११ गुंठे जास्त जागा फुलझाडें व फळझाडें लावण्याकरितां अर्ज करून मागितली होती. ती देण्याबद्दल हुकुम झाला आहे. ती ताब्यांत आल्यावर जास्त फुलझाडें लावण्याची तजवीज होईल.

३ लेंडीबागेची जागा रा. ब. मोरेश्वरराव प्रधान, सांताक्रूझ यांनीं विकत घेऊन संस्थानास अर्पण केल्यावरही पुष्कळ वर्षे त्या ठिकाणीं बाग बनविण्याची वेळ आली नाहीं. त्यामुळें उत्कटेच्छा असतांही पुष्काळ भक्तांना श्रीचरणीं तुळशी व फुलें वाहण्यास मिळत नसत. एकदोन दिवस मुक्काम करणारा भक्त आपल्याबरोबर फुलें तुळशी आणण्याची तजवीज करीत असे, पण ८-१५ दिवस मुक्काम करणाऱ्या भक्ताची फारच तारंबळ उडे. मुंबई, पुणें, नगर, वगैरे ठिकाणाहून ही सामग्री आणण्याची त्यानें कितीही तजवीज केली, तरी एकदोन दिवसानंतर शिळ्या, सुकलेल्या व वाळून चुरा झालेल्या तुलसीपत्रांवरच आपली मनीषा पुरी करून घेणें त्याला भाग पडे. हल्लीं त्या जागेंत उत्तम बाग झाल्याकारणानें ही फार दिवसाची उणीव नाहींशी होऊन भक्तवृंद परम संतुष्ट झाला आहे. बाबा रावबहादुरांचें व त्यांच्या मुलाबाळांसह सर्व कुटुंबाचें सदैव कल्याण करोत.

४ या वृत्तान्तकथनाच्या वर्षी श्रीयुत माळीबुवांच्या जागीं श्री. बाळा काशीराम शिंपी शिरडीकर यांची दरमहा ८ रुपये पगारावर संस्थानकमिटीनें कायमप्रमाणें नेमणूक केली आहे.

५ याच वृत्तनिवेदनाच्या वर्षांत मंदिरांत एक तासभर चक्रीभजन करण्याची सुरवात श्रीदासगणूमहाराजांच्या सांगण्यावरून झाली आहे. पायांत चाळ घालून, कमर कसून, हातीं वीणा घेऊन तालसुरांत अभंग म्हणून, मागील टाळकरी समूहासह निरनिराळ्या तऱ्हेनें चक्राकार नर्तन करण्यांत वर लिहिलेल्या श्री. बाळा काशीराम शिंपी यांचा मुख्य भाग असतो. हें भजन श्रींच्या समाधीपुढें दररोज दुपारीं ३ तें ४ पर्यंत होतें. जरूर प्रसंगी ह्या वेळांत बदलही करण्यांत येतो.

६ त्याचप्रमाणें या वृत्तांतकथनाच्या वर्षांत श्रींच्या समाधीपुढें नित्य गायन व श्रीज्ञानेश्वरी, श्रीसाईसच्चरित, रामायण व एकनाथी भागवत या पुण्यग्रंथांचें नित्य पुराण यांची व्यवस्था केली आहे. सकाळीं एक तास गवयाचें गायन, दुपारीं एक किंवा दोन तास पुराण, सायंकाळीं सतार-वादन व रात्रीं भजन, तसेंच एकादशी, गुरुवार व इतर सणाच्या किंवा पर्वणीच्य दिवशीं दिवसा अगर रात्रीं कथा, श्रीसाईपरमात्मा हे स्वतः अप्रतिम गात व उत्कृष्ट भजन करीत असत (श्रीसाईलीला वर्ष ३ अंक पहिला पान १७९–१८० पाहा) म्हणजे बाबांना गायनाची व भजनाची अत्यंत आवड असे; तसेंच ते प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरावतार होते. म्हणून ही गायनाची व श्रीज्ञानेश्वरीपुराणाची व्यवस्था केली आहे. शिवाय संस्थानास गायन, कीर्तन व पुराण याशिवाय शोभाच नाहीं. बहुतेक प्रत्येक संस्थानांत ही व्यवस्था असतेच. ज्या ठिकाणीं ती नसते ती केवळ द्रव्याभावामुळेंच. आतां आपल्या या शिरडी संस्थानांत सुद्धा द्रव्यनिधि मुबलक आहे असें नाहीं. तथापि बाबांच्याच प्रेरणेनें ही व्यवस्था झाली आहे. तरी या कामीं लागणाऱ्या खर्चाची उणीव भासूं न देतां केलेली व्यवस्था तेच निरंतर चालवितील अशी बलवत्तर आशा आहे.

यां कामीं श्रीशिरवळ येथील रहिवासी गायनवादन पटु श्री. गणेश गोपाळ देशपांडे यांची नेमणूक गेल्या फाल्गुन महिन्यापासून केली आहे. व ते हल्लीं त्याप्रमाणें कामही करीत आहेत. त्यांना कांहीं भक्तांनीं नवीन तंबोरा, नवीन तबला (डग्यासह) व नवीन सतार घेऊन दिली आहे. हे गृहस्थ देशस्थ ब्राह्मण असून वयस्कर आहेत. ते वारकरी पंथाचे आहेत. त्यांची नेमणूक दरमहा २० रुपयांवर केली आहे. हे बाबांच्या गायनपटुत्वाचें व गायनप्रेमाचें अंशतः स्मारकच म्हटलें तरी चालेल. हे बुवा दरसाल श्रीपंढरीची व श्रीआळंदीची वारी करीत असतात. वारीच्या खर्चाकरतां बुवांस पगाराशिवाय निराळे पैसे देण्याचा ठराव संस्थानकमिटीनें बुवांच्या विनंती-वरून केला आहे.

७ अद्याप श्रीसाईलीलेवर झालेला भक्तवृंदांचा रोष शांत झालेला दिसत नाहीं. त्यामुळें प्रत्येक वर्षी श्रीसाईलीला मासिकास लागणाऱ्या वार्षिक खर्चापेक्षां मासिकच्या वर्गणीचें उत्पन्न ३०० रुपयांनीं कमी येतें. शिर्डी संस्थानची सर्व यच्चयावत् हकीकत निदान एक महिन्यानें तरी निरनिराळ्या स्वरूपांत भरतभूमिवर पसरलेल्या बाबांच्या असंख्य बालगोपाल-भक्तवृंदास सविस्तरपणें कळणें अवश्य आहे व ती अशाच प्रकारच्या मासिकद्वारें कळणार. म्हणून अशा मासिकाची अत्यंत जरूर आहे. या-बद्दल दुमत होणें शक्य नाहीं. या मासिकाकडे वाङ्मय या दृष्टीनें पाहा-वयाचें नाहीं. अनुभव लिहितांना सर्वच व्याकरणशुद्ध, चटकदार, हृदयंगम भाषा वापरणारे असतात असें नांहीं व अनुभव तशा भाषेंत देणेंही इष्ट नाहीं. ज्याला जसा अनुभव आला असेल व जो ज्या अधिका-राचा, शिकलेला, न शिकलेला, अल्प शिकलेला असेल, त्याप्रमाणें त्याची भाषा अनुभवांत दिसणार. अनुभव अगणित भक्तांस येतात, पण ते सर्व प्रसिद्धीकरतां देत नाहींत, अशा अनेक अडचणी असतात. कांहीं झालें तरी अशा मासिकाची नितांत अवश्यकता आहे, ही गोष्ट नाकबूल

करतां यावयाची नाहीं. मग त्यापासून द्रव्यदृष्ट्या संस्थानची नुकसानी होवो या लाभ होवो. तें चालविलेंच पाहिजे. करितां अद्यापपर्यंतही रुसवा न केलेल्या श्रीसाईलीलेच्या आश्रयदात्यांचा वर्ग आपला रुसवा कमी करून पुनरपि तिजवर केवळ बाबांची सेवा या दृष्टीनें पूर्ववत् प्रेम करील, तिच्या दोषांकडे लक्ष न देतां तिच्या उपयुक्ततेकडे लक्ष देऊन तिच्याकडून सदैव सेवा घेत राहील व आश्रयदात्यांच्या औदासीन्यामुळें तिला आलेली कृशता जाऊन त्यांच्या प्रसन्नता व कारुण्यार्द्र अमृतपानामुळें तिला एक प्रकारचें बाळसें चढून पूर्वीप्रमाणें तिला पुष्टीतुष्टी येऊन ती परमानंदानें नाचूंबागडूं लागेल व त्यायोगें तिचे आश्रयदाते बाबांची सतत सेवा करीत राहतील व संस्थाननिधीस हातभार लावतील अशी संस्थानकामिटीतर्फे माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

८. याच वृत्तनिवेदाच्या वर्षांत प्रसिद्ध ललितकलादर्श नाटकमंडळीचे अत्यंत उदार, परमोत्साही, फार शिस्तवार, मर्यादशील व मनमिळाऊ मालक श्रीयुत रा. व्यंकटराव बलवंत ऊर्फ बापूसाहेब पेंढारकर यांनीं श्रीशिर्डीसंस्थान कायमनिधिवर्धनास मदत म्हणून पुन्हा ता. २-३-३२ रोजीं "सत्तेचा गुलाम" या नाटकाचा खेळ मुंबई-एल्फिन्स्टन नाटकगृहांत करून खर्चवेंच वजा जातां बाकीचें उत्पन्न रु. १००१ संस्थानकमिटीस दिलें, याबद्दल ते अत्यंत स्तुतीस पात्र आहेत. सन १९२५ सालांतही त्यांनीं असेंच एका नाटकाचें, खर्चवेंचाबद्दल एक पैही न घेतां, आलेलें सर्व उत्पन्न बाबांवरील त्यांच्या मातु:श्रीचें व त्यांचें अतुल प्रेम व एकनिष्ठ भक्तीचें दर्शन म्हणून, जसेंच्या तसेंच संस्थाननिधिवर्धनाच्या मदतीकरतां दिलें. त्याबद्दलची हकीकत पूर्वीच श्रीसाईलीलेच्या एका अंकांत सविस्तर प्रसिद्ध झाली आहे. बापूसाहेबांचें बाबा पूर्ण कल्याण करोत व त्यांच्या अंगीकृत कार्यांत त्यांना पूर्ण यश देवोत.

९ कै. भक्तवर्य दामोदर घन:शाम बाबरे ऊर्फ अण्णा चिंचणीकर यांनीं मृत्युपत्रद्वारें दिलेल्या आपल्या चिंचणी, नेवाळें व वेढें या गांवच्या

मिळकतीसंबंधानें ठाणें, डहाणू, या डि. व सबजज्ज कोर्टांत व मुंबई-हायकोर्टांत चाललेल्या अर्जासंबंधीं व दाव्यासंबंधीं हकीकत सविस्तरपणें पुढील एखाद्या साईलीलाअंकांत प्रसिद्ध होईल.

१० श्रींच्या मंदिरापुढील जागेंत सभामंडप बांधण्याच्या कामीं श्री. दासगणूंची खटपट सुरू आहे. संस्थानकमिटीही आपल्यापरी दीर्घ प्रयत्न करीत आहे. कमिटीच्या सभासदांपैकीं बहुतेक सर्वांचें म्हणणें सभामंडप श्रींच्या मंदिरापासून थेट श्रीद्वारकामाईपावेतों मंदिरास शोभण्यासारख्या भव्य, दगडी, व विस्तीर्ण असा असावा. श्रीदासगणूमहाराजांचें म्हणणें सभामंडपाचें काम सुरू केल्यावांचून कोणी पैसे देत नाहींत; करितां कांहीं तरी काम सुरू करावें व सभामंडपाकरितां आतांपर्यंत जी काय थोडीशी वर्गणी आली असेल ती खर्च करावी व या सभामंडपांत बाबांनीं घेऊन ठेवलेल्या श्रीरामाच्या मूर्ति बसवाव्या. पण असें करण्यांत इष्टार्थ साध्य न होतां निष्कारण अडचणी मात्र उत्पन्न होतील असें कमिटीस वाटतें. श्रीराममंदीर कोठें व केव्हां बांधावें याबद्दलची बाबांनीं आज्ञा केल्याचें कोणीच सांगत नाहीं. तथापि त्यांच्या इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून येणार हें खास. खात्रीनें बाबा कोणास तरी आज्ञा व प्रेरणा करतील व आपण घाई न करतां त्या काळाची अपेक्षा करीत बसणें हेंच उचित.

११ श्रींचें समाधिदर्शन घेण्याकरितां येणाऱ्या भक्तसंघाची स्नान, धुणें, खाणें, पिणें, निजणें, बसणें वगैरेंची सोय लेंडीबागेंत, दीक्षित-वाड्यांत, व कांहीं भक्तांनीं बाबांना अर्पण होणाऱ्या निरनिराळ्या घरांत करण्याचे बेत चालू आहेत. परंतु द्रव्याभाव या बेताच्या आड येत आहे. गुरुमाउलीची जशी मर्जी असेल तसें घडेल.

१२ कै. भक्तवर्य दामोदर घनःशाम बाबरे उर्फ आण्णा चिंचणीकर यांच्या मिळकतींपैकीं नेवाळें व चिंचणी या गांवच्या जमीनीच्या थकलेल्या उत्पन्नाच्या वसुलाचे व येढें गांवच्या जमीनीचें उत्पन्न मिळण्याबद्दल कोर्टांत

दावे सुरू आहेत. भातास व गवतास भाव नाहीं. भाताच्या व गवताच्या किंमती कल्पनातीत उतरून गेल्या आहेत. त्यामुळे वसूल देण्यास त्राण नाहीं अशी कुळांची सबब आहे व ती कांहीं अंशीं खरीही आहे. कुळें लाचार झालीं आहेत.

१३ कै. काका साहेब दीक्षित यांच्या वाड्यांतील जो भाग श्री. माधवराव देशपांडे यांना भाड्यानें दिला आहे, त्याची ११ महिन्याची भाडेचिठ्ठी त्यांच्याकडून घेतली आहे. त्या वाड्यांतच दोन खोल्या संस्थानांत नवीन नेमणूक केलेल्या श्री. देशपांडे गवईबोवास राहण्यास दिल्या आहेत. सर्व वाड्यावर श्री. माधवराव देशपांडे पूर्ववत कृपेनें देखरेख ठेवीत आहेत. बाबांच्या इतर घरांत राहणाऱ्या भाडेकऱ्यांचे वार्षिक करार ही करून घेतले आहेत.

१४ सालमजकुरीं या संस्थानांत नेहमीप्रमाणें रामनवमी, गुरुपौर्णिमा गोकुल अष्टमी, व पुण्यतिथी हे चार उत्सव साजरे करण्यांत आले. गोकुळ अष्टमी खेरीज इतर तिन्ही उत्सवाची तपशीलवार हकीकत श्री साइलीलेंत त्या त्या वेळीं प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

१५ संस्थानचे सन्मान्य सेक्रेटरी श्री. सुंदराव दीनानाथ नवलकर ह्यांनीं "शिरडी वृत्त" या शीर्षकाखाली प्रत्येक महिन्यांत मंदिरासंबंधीं घडलेली बारीकसारिक व महत्वाची हकीकत वाचकांच्या व भक्तांच्या माहितीकरितां देण्याचे योजून गेल्या जान्युअरी १९३३ पासून ती तपशीलवार देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे संस्थानसंबंधानें अन्यत्र राहाणारा भक्तवृंद काय काय करीत असतो, त्याची माहिती श्रीसाईलीला वाचकांस शिरडीस न जातां घरीं बसून मिळते व ती वाचून आपणही असेंच कांहीं तरी करावें अशी शिरडीसंबंधीं अपरिचित असलेल्या स्त्री-पुरुष भक्तांच्या मनांत प्रेरणा उत्पन्न होते व अहमहमिकतेनें तोही तसें शक्त्यानुसार करूं लागतो व बाबांच्या कृपेस पात्र होऊन आपलें कल्याण करून घेतो. शिर-

डीस कधींही न जाणाऱ्या किंवा फार झालें तर वर्षातून एक वेळ जाणाऱ्या भक्तास या शिरडीवृत्तापासून फारच माहिती मिळते.

१६ या वृत्तकथानाच्या वर्षारंभाची शिल्लक रु. ३९६६५-१०-८ असून साल अखेरची शिल्लक ४३३५८-८-० इतकी आहे. म्हणजे या वर्षांत रु. ३६९२-१३-४ निरनिराळया स्वरूपांत जमा झाले दरसाल बहुतकरून कमीअधिक प्रमाणानें इतकेच रुपये जमा होतात. गेल्या व चालू सालच्या किरकोळ व ठोकळ बाबींच्या उत्पन्नांत फारसा फरक नाहीं. खर्च २४०० रु. पर्यंत होतो. ३०० रु. श्रीसाईलीला प्रसिद्ध करण्याच्या कामीं तूट येते व सुमारें १००० रु. कायमनिधीच्या किंवा कोठीच्या शिल्लकेंत पडतात. संस्थानचा एक लक्ष निधि जमण्यास हा वृद्धिक्रम किंवा पिपीलिकागतिक्रम फारच अपुरा आहे, हें निर्विवाद आहे.

१७ अनंत कोटि ब्रह्मांडाची निमिषार्धांत अलिप्तपणें वटमोर्डी केल्याचा भास दाखवून त्या सर्वांचा लयही आपल्याच ठिकाणीं, ऊर्णनाभप्रमाणें करून स्वतःच्याच अशरीर रंगभूमीवर सगुण शरीरलीलाचमत्कृतींच्या नाटकाचे रात्रंदिवस अहेतुकपणें थयमान करीत राहून अखेरपर्यंत आपला पत्ता लागूं न देणाऱ्या विश्वकर्त्या भर्त्या हर्त्या सच्चिदानंद श्रीसमर्थ सद्गुरुसाइनाथ प्रभु परमात्म्याचे दिव्य चरण सहस्र पत्रांवर हे वृत्तांतवाक्तुलसीपत्र परमादरानें, प्रेमानें, भक्तीनें, आनंदानें प्रथम अर्पण करून नंतर जनीजनार्दनास तितक्यांच प्रेमभावानें, भक्तीनें, आनंदानें व आदरानें अर्पण करून जमाखर्चाच्या आढाव्यासह प्रसिद्धीकरणार्थ आपल्याकडे पाठवून आपली रजा घेतों.

## ईशप्रार्थना:—

( स्रग्धरा )

अठ्ठाशे चौपनाच्या, गुरुपदकमलीं, अर्पुनी वृत्तलेखा ।
प्रार्थी माफी चुकीची करुनि, सुमति दे. हो सदा पाठिराखा ।
साई देवा समर्था, नमुनि विनवि, घे पल्लवीं सेवकाला ।
मेवा त्वत्पादसेवा मधुर रुचिर हे नित्य द्या बालकाला ॥ १ ॥

व्यय–अर्थ–सह वृत्तकथन अष्टादश बाण वेद वर्षाचें ।
श्रीपदिं अर्पुनि प्रार्थी नाशी बीज स्पृहा–अर्वर्णाचें ॥ २ ॥

ठाणें, गुरुवार,
ज्येष्ठ कृ. ९
शके १८५६

बालकृष्ण विश्वनाथ देव

संतचरण दासानुदास शिरडी सं. विश्वस्त

---

१ खर्च २ जमा ३ अहवाल report ४ दाठरा ५ पांच ६ चार म्हणजे १८५४ सालाचें ७ काम ८ क्रोध.

॥ श्रीशंकर ॥

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणि श्रीसाईबाबा महाराज, संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. नगर यांच्या शालिवाहन शके १८५६ सालच्या श्रीरामनवमीच्या उत्साच्या जमाखर्चाचा तपशीलवार खर्डा

## जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| १५-२-० | हालगुदस्त शिल्लक |
| ५०-०-० | श्री. भास्कर रामचंद्र चांदोरकर, सिव्हिल सर्जन, बिलासपूर |
| ५१-०-० | श्रीमती गिरजाबाई होळकर, बनसुडे मासाहेब महाराज, इंदोर |
| २५-०-० | श्री. भवानराव बनसोडे, महू |
| १७-०-० | ,, त्र्यंबक अनंतराव कर्णिक मार्फत द्वारकानाथ गजानन मनोरमाबाई, शंकर, अनंत प्रधान, भास्कर, द्वारकानाथ |
| १८-०-० | श्रीमंत सरकार बाबासाहेब इचलकरंजीकर, तुपाचा डबा १ |
| १५-०-० | सौ. सुशीलाबाई गोपाळ दातार ठाणें, तुरीच्या डाळीबद्दल |
| १०-०-० | डॉ. वासुदेव रघुनाथ तळवलकर, इंदुर |
| १०-०-० | श्री. बापुभय्या कोठारी, इंदूर |
| १०-०-० | ,, नारायण जनार्दन तेंडुलकर, मुंबई |
| ११-०-० | सौ. सुभद्राबाई पांडुरंग म्हात्रे, अंधेरी |
| २३२-२-० | |

## खर्च

| रु. आ. पै | |
|---|---|
| २८२-०-० | कचरू आनंदराम मारवाडी यास रामनवमीचे उत्सवांत तांदुळ, डाळ, तूप यादीबरहुकूम सामान आणिले त्याबद्दल दिले |
| १३०-२-६ | मुखेडाचे चिन्नपानें इचलकरंजीकर यानें चार तुपाचे डबे खरेदी केले, ते व नागोबा बाबा यांचे दोन डबे असें एकंदर तूप लागलें तें. |
| २८-११-० | मुसलमान लोकांच्या जेवणाचा खर्च-हस्तें कचरू मळ |
| २७-१-९ | महार, मांग, वडार यांच्या जेवणार्थे सामान घेतलें; हस्तें कचरू मारवाडी |
| २९-०-० | साखर कमी पडलेली आणली हस्तें चिन्नप्पा मुखेडकर |
| ५०-०-० | हुसेन उस्मान दरूवाला |
| १९-०-० | हुसेन समदुभाई बाजेवाला राहतेकर यास बाजाबद्दल (१८+१-१९) |
| ७४-०-० | गोविंद काशीनाथ करंवेळकर आचारी यांस दिले |
| ६३९-१५-३ | |

## जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| २३३–२–० | |
| ११–०–० | ,, लक्ष्मीबाई मुकुंदराव पाटील, अंधेरी |
| ११–०–० | श्री. रघुनाथ सदाशिव पाटील, अंधेरी |
| ११–०–० | डॉ. बाळकृष्ण सदाशिव पाटील, अंधेरी |
| ११–०–० | सौ. शांताबाई शांताराम नावलकर, अंधेरी |
| ११–०–० | श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर, पुणें |
| १०–०–० | श्री. शकुंतलाबाईसाहेब बुळे, इंदोर |
| ७–८–० | श्री. काशीनाथ पांडुरंग कुळकर्णी, ठाणे |
| १५–०–० | श्री. भवानीशंकर गणपत ससीतळ, पार्ला |
| ७–८–० | श्री. बाळाजी गोविंद रासणे, (तांदळाचें पोतें एक), नगर |
| ७–०–० | श्री. दिनकर गजानन कीर्तिकर, मुंबई |
| ५–०–० | श्री. तुळशीदास खेमजी भाटे, सांताक्रूस |
| १०–०–० | श्री. शंकर सीताराम कर्णिक, ठाणें |
| ५–०–० | श्री. दामोदर बाळकृष्ण बापट रत्नागिरी |
| ५–४–० | श्री. भिकाजी हरि रिसबूड, कुलाबा |
| ५–०–० | श्री. जनार्दन सीताराम घटे, सोलापूर |
| ५–०–० | श्री. हिरालाल माणिकलाल डहाणुकर, बडोदें |
| ५–०–० | श्री. लक्ष्मीबाई पुणेंकर |
| ३७४–६–० | |

## खर्च

| रु. आ. पै | |
|---|---|
| ६३९-१५-३ | ५० रु. स्वयंपाकाबद्दल<br>२४ रु. गाडें जाण्यायेण्याचें<br>—<br>७४ |
| २९–०–६ | दुधाबद्दल, हस्तें राधाबाई |
| १६–०–० | बाबा धर्माधिकारी नगरकर यांस आध्यात्म रामायणाच्या पारायणाबद्दल<br>१० रु. दक्षिणा<br>२ ,, गाडीभाडें<br>४ ,, उपरणें पान<br>—<br>१६ |
| १८–८–३ | पांच दिवसांत भाजीपाला आणला त्याबद्दल, हस्तें चिन्नपा तांबोली |
| ११–१–९ | पांच दिवसांत भोजन-दक्षिणा दिली ती, हस्तें अनंत दामोदर आठवले |
| ९-१५-० | रामनवमीच्या दिवशीं अभिषेकाची दक्षिणा |
| ९-१२-० | रामनवमीच्या दिवशीं दक्षिणा दिली |
| १०–०–० | विठोबा भाऊ सुतार यास अर्पणाबद्दल दिले |
| २–०–० | महंमद सय्यद ताशेवाला यास दिले |
| ४-१४-० | करीमभाई कोपरगांव बजीवाला व राज महंमद बदुद्दीन येवलेवाला |
| ७५१–२–९ | |

जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| ३७४-६-० | |
| ५-०-० | श्री. विनायक यशवंत प्रधान, वकील, यावल |
| ५-०-० | श्री. गोविंद काशीनाथ पुणेकर |
| ५-०-० | ,, महादेव विष्णु करमरकर, दौंड |
| ५-०-० | ,, रावसाहेब नगरकर, इन्कमटॅक्स इन्स्पेक्टर, नगर |
| ५-०-० | ,, हरिश्चंद्र रामजी मिस्त्री, अंधेरी |
| ५-०-० | बाळकृष्ण नारायण देशपांडे, खामगांव |
| ५-०-० | श्री. बळवंत हरि कर्णिक, अंधेरी |
| ५-४-० | ,, विनायक अप्पाजी वैद्य, अंधेरी |
| ५-४-० | ,, यशवंत सदाशिव पाटील, अंधेरी |
| ५-०-० | रावबहादुर कोठारे, खामगांव |
| ५-०-० | श्री. बापुराव तांबोळकर, पंढरपूर |
| ५-०-० | ,, रामचंद्र सीताराम देव, अंधेरी |
| ५-०-० | ,, रघुनाथ बळवंत अळेकर, इंदोर |
| ५-०-० | डॉ. कृष्णाबाई केळवकर, कोल्हापूर |
| ५-०-० | श्री. बापुराव राघोजी बोरावके, शिर्डी |
| १-४-० | ,, यमाजी गंगाराम जगताप, इंदूर |
| ५४१-२-० | |

खर्च

| रु. आ. पै | |
|---|---|
| ७५१-२-९ | |
| ११-०-० | वासुदेव भंडार कवठे<br>५ रु. संभावना<br>२ ,, उपरणे पान<br>४ ,, गाडीभाडे<br>११ |
| १०-८-० | केशर, बदाम, किशमीस पुण्याहून आणले, हस्तें वहिनीबाई |
| १३-१४-३ | समाधीकडील पांच दिवसाचें सामान.<br>९-६-३ किरकोळ<br>४-८-० सामान<br>१३-१४-३ |
| ५-०-० | भिवराज पन्नालाल मारवाडी तागा १ मांडवाबद्दल |
| ५-०-० | अनाथ विद्यार्थी यास मदत शाळा शिर्डी, हस्तें हेडमास्तर |
| ५-०-० | नाना चोपदार यास पांच दिवस पाणी भरण्याबद्दल |
| ७-०-० | विठ्ठलरुक्मिणीच्या पूजेबद्दल<br>५ रु. पूजेबद्दल<br>२ रु. किरकोळ उपरणे पान<br>७ |
| ६-८-० | गहूं पोतें १ मणभर निवृत्तीनें दिलेले खर्च |
| ९-०-० | गुळाच्या ढेपा ३ आणिल्या त्याचा खर्च:<br>२ बापूराव यांनीं दिल्या<br>१ गांधींनीं दिली.<br>३ |
| १५-०-० | गहूं, ज्वारी, मुगांची डाळ घेतलल्याबद्दल, हस्तें बाबुराव नाना गोंदकर |
| ८३९-१-० | |

## जमा

रु. आ. पै

४५१–२–०

१–४–० श्री. आईसाहेब तेंडुलकर, मुंबई

१–०–० श्री. घनःश्याम शिवराम पोतदार

१–०–० ,, आत्माराम हरि चौबळ, डहाणू

१–०–० ,, दामोदर चिंतामण घोसपुरकर, घोसपुरी

१–०–० सौ. सरस्वतीबाई गणपत पाटकर

१–०–० श्री. यशवंत विष्णु कौजलगीकर

१–०–० सौ. उमाबाई माधवराव रुईकर

१–०–० ,, गोपिकाबाई, ठाणें

१–०–० लक्ष्मीबाई गजानन, वांद्रा

१–०–० श्री. बाबुलाल मोतिलाल

१–०–० ,, लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशिक

१–०–० ,, प्रभाकर विनायक कर्णिक

१–०–० ,, खंडेराव रामचंद्र

१–०–० ,, खंडेराव सानकर

१–०–० ,, पाऊबाई ममदापूरकर

१–०–० श्री. परानकर, पंढरपूर

१–०–० कुमारी चंद्रा आत्रे—,,—

६–०–० श्री. आनंदराव डोळस

१–०–० ,, शिवराम वासुदेव गोखले, तारमास्तर, येवला

१–०–० ,, नारायण बाळाजी कासार, नगर

१–०–० ,, कृष्णनाथ मारुति

१–०–० ,, वासुदेव भंडार कवठी, पंढरपूर

४७३–६–०

## खर्च

रु. आ. पै.

८३९–१–०

४–०–० पन्नालाल मारवाडी, पत्रावळीबद्दल

३–८–० भटयास दूध घेतलें; हस्तें राधाबाई

४–०–० तांबडें तिखट, हस्तें राधाबाई मारवाडी

१७–१२–६ अमोलक राजरूप मारवाडी, रामनवमीस गोरगोरिबांकरितां कपडा घेतल्याबद्दल

५–०–० त्र्यंबू शिंपी यास शिलाईबद्दल

९–४–० एकादशीच्या फराळाचें सामान घेतलें; हस्तें चित्रपा

२–०–० उसमान ताशेवाला राहातेकर

३९–१३–६ किरकोळ खर्च पावतीप्रमाणें

५०–०–० हल्लीं शिक्का रुपये बट्टा आले त्याचा बट्टा

१३–४–६ बाळा पिलाजी गुरव यास दिले. पावती बरहुकूम म. आ. पाठविले

४९–०–० संस्थानांतील मंडळीस उपरणीं वाटलीं त्याचा तपशील:—

३–०–० नाना पुजारी
२–८–० बाळा शिंपी
२–८–० नाना चोपदार
२–०–० मार्तंड भगत
२–०–० गंटु शिंदे
२–०–० अक्षी जाजी
२–०–० रामा न्हावी
२–०–० बयाजी जगताप
२–०–० लक्ष्मण
२–०–० नारायण शेळके

१०३४–१५–६

## जमा

रु. आ. पै.

४७३-६-०

१-०-० ,, मुकुंद गोविंद नाईक, वांद्रा

१-०-० ,, नामा गोंदकर, शिर्डी

१-०-० ,, गोपाळराव रामचंद्र आसगेकर

१-०-० नसूबाई, रावणगांव

०-८-० श्री. राहुरीकर

०-८-० ,, सोनाबाई गणपत

०-४-० ,, विष्णु हरि दातार

०-४-० ,, देशमुख, ठाणे

०-२-० ,, फाटक

०-८-० ,, वसंत गजानन दाभोळकर

०-८-० श्री. दुर्गाबाई सामंत

१-४-० ,, एस्. यी. कुडाळकर, वांद्रा

६-८-० ,, निवृत्ति हणमंता गोंदकर; गहूं दिले

५-०-० ,, दामोदर रामकृष्ण दीक्षित, नागपूर

५-०-० ,, गंगाधर भाऊ महाजनी, पुणें

४-१०-० ,, गोपाळ रघुनाथ तळवळकर, उमरावती

४-०-० ,, श्रीकृष्ण पाटील, अंधेरी

४-०-० ,, शांताराम बळवंत नाचणे, डहाणु

४-४-० ,, आनंदराव परशराम डोळस

६-०-० ,, बापुराव राघोजी बोरावके, शिर्डी, गुळाच्या ढेपा दोन

३-०-० श्री. बापूराव जोशी, ऑडिटर, कुर्डुवाडी

३-०-० कुमारी कमलाबाई आडगांव

६६-१०-०

## खर्च

रु. आ. पै.

१०३४-११-६

२-०-० रंगनाग गुरव

२-०-० दामु शिंदे

२-०-० रावजी तेली

२-०-० महादु फसले

२-०-० अण्णा

३-०-० गवईबुवा

२-०-० शिर्डी ताशेवाला

५-०-० बाळा गुरव

२-०-० पंडित गवई

४-०-० वासुदेवशास्त्री

१-०-० त्र्यंबकराव

४९-०-०

९-०-० दासगणूकडून चिठ्या गेल्या त्याचा टपालखर्च

४०-०-० सुंदरराव दिनानाथ नवलकर यांच्या हस्तें चिठ्या गेल्या त्याचा तपशील.

१-१२-० कव्हर

१-१०-० लेबलं

७-८-० निमंत्रण-पत्रिका छापणावळ

०-१२-० नांदेडास पार्सल पाठविल्याबद्दल

२८-६-० पोस्टेज

४०-०-०

५१-१५-६ बाळा गिलाजी गुरव व त्यामार्फत प्रसाद रवाना झाला त्याबद्दलच्या खर्चाचे तपशील:

कापड ३-१५-०

शिलाई २-८-०

११३५-११-०

| जमा | |
|---|---|
| रु. आ. पै | |
| ५२६-१०-० | |
| ३-०-० | श्री. दत्तोपंत काणे, पुणें |
| ३-०-० | ,, दादाजी गोपीनाथ, दादर |
| ३-०-० | ,, राहुतेकर गांधी, गुळाची हेप |
| २-०-० | सातारकर कोमटीण, पंढरपूर |
| २-०-० | श्री. विठ्ठल वामन दातार, खामगांव |
| २-०-० | ,, दिनकर मोरेश्वर पाटकर |
| २-०-० | श्री. सरस्वतीबाई कोठारी |
| २-०-० | श्री. साईनाथ सेवामंडळ, पुणें |
| २-०-० | श्री. गंगाधर नारायण वाफकर |
| २-०-० | सौ. सरस्वतीबाई म्हात्रे |
| २-०-० | श्री. रघुनाथ नारायण शृंगारपुरे |
| २-०-० | श्री. गोपाळ भास्कर दातार, ठाणें |
| २-०-० | ,, यंडया बापट |
| २-०-० | ,, दत्तोपंत खैर, पेन्शनर पोस्टमास्तर, पंढरपूर |
| २-०-० | ,, गोविंद हरि तळवलकर, ओव्हरसियर |
| २-०-० | प्रो. आपटे, कोल्हापूर |
| २-०-० | प्रि. श्यामराव के...कर, लॉ-कॉलेज, कोल्हापूर |
| २-०-० | आईसाहेब केळवकर कोल्हापूर |
| २-०-० | श्री. बगुबाई करजकर |
| २-०-० | ,, पेंडसे, पोस्टमास्टर, येवलें |
| १-४-० | ,, रामचंद्र वामन पाठक |
| १-४-० | ,, शंकर नाना पाटील |
| १-४-० | ,, दत्तात्रय नारायण पाटणकर, बांद्रा |
| ५७३-६-० | |

| खर्च | | |
|---|---|---|
| रु. आ. पै. | | |
| ११३५-११-० | | |
| | १ रिळ | ०-०-९ |
| | रद्दी | ०-४- |
| | साखर | ३-७- |
| | सुंठ | ०-८- |
| | पोस्टेज | ४०-१२- |
| | | ५१-१५- |
| ५-०-० | दासगणूंचे मार्फत प्रसाद गेला त्याबद्दल | |
| ४०-०-० | किरकोळ खर्च बिनपावतीचा हस्तें दासगणू | |
| १५-०-० | शिष्टसंभावना. भाऊ कुंभा वगैरे लोकांस पांच दिवसां दिले गेलेले | |
| ९३-०-० | इगतपुरीस पेटींतील रक्कम आली ती दिली, हस्तें तात्या पाटील कोतें | |
| १२८८-११-० | एकंदर सर्व पावत्या मिळवून झालेला खर्च | |
| ४३-११-३ | शिल्लक राहिली ती संस्थान-कमिटी ठरवील त्या खात्यास जमा होण्यास पाठविली. | |
| १३३२-६-३ | | |

अक्षरीं तेराशें बत्तीस रुपये सहा आणे तीन पै फक्त.

जमा

आ. पै.

१-६-०

१-४-० कै. सौ. रमाबाई बळवंत नाचणे, कुर्ला

१-४-० श्री. सदाशिव शान्ताराम नाचणे, कुर्ला

१-४-० श्री. वामन हरि रुईकर, ठाणें

१-४-० ,, गजानन गोविंद दाभोळकर, वांद्रा

१-४-० कुमारी उमाबाई पुरुषोत्तम वाघ, वांद्रा

१-४-० श्री. हरि गोपाळ सकपाळ

१-४-० सौ. चंपूबाई

१-४-० श्री. बापू

१-४-० श्री. राधाबाई यशवंत तेंडुलकर

हल्लीं शिक्का रुपये

१५-०-० श्री. धोंडो दत्तात्रय वकील, नांदेड

१५-०-० ,, राजताईव माझोडकर

११-०-० ,, जगन्नाथ मास्तर सदर मुदर्रीस उमावूर

१०-०-० श्री. कनय्या बालय्या तांबोळी

११-०-० ,, चनय्या मुक्कावार मुखेड

११-०-० ,, गोविंद वामन पानशिवडी, करमुखेड

११-०-० ,, बाबा रामचंद्र पत्तेवार, गऊहाण

११-०-० ,, गंगाधर मारुति पत्तेवार, मुखेड

११-०-० ,, मारुति विरेशा पत्तेवार, मुखेड

२१-०-० ,, बाबा रंगारी, तुपाचा डबा १, उमरी

७११-१०-०

## जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| ७११-१०-० | |
| २१-०-० | ,, नागोबा वंजारी, तुपाचा डबा १, उमरी |
| ५-०-० | ,, नागनाथ कृष्णा चौधरी, मुखेड |
| १०-०-० | ,, नरसिंगा रंगारी, उमरी |
| १०-०-० | ,, नागनाथ रंगारी |
| ११-०-० | ,, संभा नागोबा वंजारी |
| ६-०-० | ,, किसन माधवराव पाटील, पेट शिवणी |
| ५-०-० | ,, वेंकटलाल श्रीराम मारवाडी, उमरी |
| ५-०-० | ,, आप्पासाहेब देशमुख |
| ३-०-० | ,, भाऊराव नावंदीकर |
| १-०-० | ,, बापूराव पाटील मांजरम |
| २-०-० | ,, लक्ष्मीबाई पाटील, शिवणीकर |
| १-०-० | ,, लक्ष्मण सोनार, मांजरम |
| १-०-० | ,, विष्णुपंत मास्तर, मांजरम |
| ५-०-० | ,, गोदावरीबाई मास्तरीण, नांदेड |
| ३-०-० | श्री. बबण लल्शिंग, मुखेड |
| १-०-० | ,, शंकर अतनूरकर |
| ५-०-० | ,, रामराव राजूराकर, पाटील |
| १-०-० | ,, विनायकराव मास्तर |
| ५-०-० | ,, दादासाहेब वरुडकर |
| १-४-० | सौ. हरणाबाई मांजरमकर |
| १-०-० | श्री. अनंत नागोराव शिंदगीकर |
| १-०-० | ,, रामराव दिवाळकर |
| १-०-० | ,, राजेश्वर गांजापूरकर |
| ८१६-१४-० | |

जमा

रु. आ. पै

८१६-१४-०

१०-०-० ,, दासगणूमहाराजांपुढें आलेले

७५-०-० ,, मोंगलाईतील लोकांनी कापड दिलें तें

श्री. रामराव वडकर
,, नागोबा वंजारी
,, चिनैया तांबोळी
,, बाबा रामचंद्र पत्तेवार
,, गोविंद पानशोडीकर
,, मारुति पत्तेवार
,, चिनैया मुकावार
,, वंकटलाल मारवाडी
,, सुरजमल मारवाडी
,, बाबा रंगारी
,, नरसिंगा रंगारी
,, नारायण रंगारी

दासगणू

श्री. दादासाहेब तर्खड खजिनदार, साई सं. शिर्डी यांच्यामार्फत जमा झाली त्याची नोंद:

१-०-० श्री. नारायण श्रीधर दीक्षित, मालाड
१-४-० ,, यादव विठ्ठल म्हात्रे
२-८-० ,, रामचंद्र श्रीपाद कुरतुडकर
१-०-० ,, विनायक जगन्नाथ गीध
०-८-० ,, गोविंद अमृतराव मुळे, माहीम
५-०-० ,, यशवंत जनार्दन गाळवणकर, वांद्रा
१-०-० श्री. दत्तात्रय महादेव कुलकर्णी, मालाड
१-०-० ,, केशव गणेश आजरेकर, बेळगाव

---

९५०-२-०

जमा

रु. आ. पै

९२०–२–०

१–०–० ,, एन्. बी. राणे, मिरा

१०–०–० ,, डॉ. के. वा. सावे, मुंबई

१०–०–० ,, दाजी विठ्ठल सांबारे, पार्ला

१–४–० सौ. सत्यवतीबाई चिंतामण सातघरे

२–०–० श्री. सांवळाराम आत्माराम शिरोडकर, कुर्ला

१–४–० सौ. राधाबाई सांवळाराम, कुर्ला

१–४–० श्री. आत्माराम सांवळाराम, कुर्ला

१–८–० ,, रामकृष्ण सांवळाराम, कुर्ला

१–४–० सौ. इंदिराबाई रामकृष्ण, कुर्ला

१–४–० श्री. श्रीधर रामकृष्ण, कुर्ला

२–४–० ,, गंगाधर मोरेश्वर सुगवेकर

३–०–० ,, जनार्दन रामचंद्र दळवी

३–०–० ,, मोरेश्वर नारायण सावे, मुंबई

१–४–० ,, म. अ. सामंत, मुंबई

१–०–० ,, र. दत्ताराम रेगे, सावंतवाडी

५–०–० ,, आत्माराम लाडोबा आरोळकर, गुंटाकल

१–०–० ,, बाळाराम बी. आचार्य

१–०–० ,, केशव नारायण विजयकर, खार

९६८–६–०

जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| ९६८–६–० | |
| २–०–० | ,, बाळकृष्ण माधवराव मानकर, वांद्रा |
| २–०–० | ,, सोनाबाई जयकर, वांद्रा |
| १–४–० | सौ. सत्यभामाबाई पं. कोरडे, कांदिवली |
| ५–०–० | श्री. नारायण बाळकृष्ण पोरे, चेउल |
| १–४–० | श्री. शंकर केरोबा शेलार, रेवदंडा |
| २–०–० | ,, श्रीधर गणेश भांडारे, सोलापूर |
| ५–०–० | ,, नारायण गोपाळ नाडकर, कुकाक्षी |
| ५–०–० | ,, काशीबाई कानिटकर, नगर |
| ४-१०-० | सौ. कृष्णाबाई विनायकराव तालचेरकर, इंदूर |
| ५–०–० | श्री. गोविंद नारायण दाभोळकर, वांद्रा |
| ५–०–० | सौ. यमुनाबाई सखाराम सामंत, शिळोत्तर |
| २–०–० | श्री. विठ्ठल जगन्नाथ खोत, दादर |
| १–०–० | ,, नरोत्तम गिरधर तन्ना, डहाणू |
| १-१०-० | ,, शामराव भास्कर कंटक, मुंबई |
| १०११–२–० | |

जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| १०११-२-० | |
| | **श्री. सुंदरराव नवलकर** |
| | हस्ते: |
| २-०-० | श्री. नारायण जगन्नाथ चोत्रे |
| २-४-० | सौ. सीताबाई राजाराम वालावलकर |
| १-४-० | श्री. मोतीराम गजानन प्रभाकर, मुंबई |
| १-०-० | ,, वहिनीबाई शंकरराव प्रभाकर, मुंबई |
| १-४-० | ,, आनंदराव गणपतराव तळपदे, वांद्रा |
| १०-०-० | डॉ. धोंडोपंत सीतानाथ अजिंक्य, मुंबई |
| २-०-० | श्री. पिरोजबाई श्रीपाद विजयकर |
| १०-०-० | ,, वी.व्हा मंजेश्वर,चिकोडी |
| ५-०-० | ,, श्रीकृष्ण गोपीनाथ दिघे, मुंबई |
| २-०-० | कु. शांताबाई अह्मडकर, मुंबई |
| ०-४-३ | श्री. शिवराम कारखानीस, मुंबई |
| ५-०-० | ,, वसंतराव गणपतराव कीर्तिकर, दादर |
| २-४-० | ,, फरदोनजी पेस्तनजी तवाडिया, मुंबई |
| ४-६-० | ,, माधव गंगाधर कोराने, बिलिमोरा |
| १०५६-१२-३ | |

जमा

| रु. आ. पै | |
|---|---|
| १०५९-१२-३ | |
| २-०-० | ,, जी. आर. दाभोळकर, अहमदाबाद |
| २-०-० | श्री. जीवनराव कल्याणजी शुक्ल, उंबरगांव |
| ५-०-० | ,, डी.एन् राजे, लोणावळा |
| १-०-० | ,, हरि कृष्ण, इटारसी |
| १-४-० | ,, श्रीमती पुतळाबाई गजानन विजयकर |
| १-४-० | ,, बेनाबाई, अजिंक्य |
| १-०-० | कै. संताबाईच्या स्मरणार्थ रामकृष्ण नाना वगळ |
| १-०-० | श्री. खंडेराव दिनानाथ वरवारकर |
| १-४-० | ,, चंपूबाई आनंदराव धराधर |
| १-४-० | ,, बाळाराम केरोबा नाईक, मुंबई |
| २-०-० | ,, के. ए. वेंद्रे, कर्जत |
| २-१२-० | ,, कु. इंदुमती आर. चोणकर, बोरवली |
| १-४-० | श्री. सुंदरराव दि. नवलकर, मुंबई |
| १-४-० | सौ. शांताबाई सुंदरराव नवलकर |
| १-०-० | श्री. काशीनाथ रामचंद्र आंजर्लेकर |
| १-०-० | श्री. ना. खारकर, ठाणें |
| १-०-० | ,, गा. वि. चौबळ |
| १-०-० | ,, वि. कृ. याम, मुंबई |
| १०८८-०-३ | |

जमा

रु. आ. पै

१०८८-०-३

५-०-० ,, गोविंदराव हरिश्चंद्र जोशी, गोरेगांव

२-८-० ,, दत्ताराम आनंदराव पितळे, मुंबई

१-४-० ,, मगन गोविंद वाळंद, केळवें माहिम

३-०-० ,, द. ल. आजरेकर, पुणें

१-०-० श्री. गंगाबाई माधवराव विजयकर, मुंबई

१-०-० श्री. सरस्वतीबाई गणपत-राव व्यवहारकर, मुंबई

३-०-० ,, बी. के. चव्हाण, पालघर

३-०-० श्री. एस. जी. परुळकर

१-०-० ,, स. वि. देव, मुळशी

१-०-० ,, गंगुबाई किन्हीकर, जळगांव

१-०-० ,,देशबंडीकरबाई,जळगांव

१-०-० ,, यमुनाबाई जोशी, जळगांव

२-०-० सौ. कमलाबाई सीताराम चौधळ, दार

२-०-० श्री. यशवंत राजाराम जुन्नर-कर, धरमपूर

१०-०-० डॉ. आर. एन्. गव्हाणकर

१-४-० श्री. एन्. जी. रेगे, दरदा

---

११२७-०-३

जमा

रु. आ. पै

११२८-०-३

१-४-० श्री. नारायण रामचंद्र देश-
पांडे, बदलापूरकर

१-०-० ,, लक्ष्मण सदाशिव नाईक,
इंदोर

१-०-० ,, एस्. एस्. पागनीस,
माटुंगा

१-०-० ,, वी. व्ही. आरस, मुंबई

१-४-० ,, आनंदराव वामनराव
व्यवहारकर

१-०-० ,, बाबाजी आनंदराव मोहिले,
पालघर

५-४-० ,, भाऊ आबाजी वैद्य,
पालघर

१-०-० ,, गणेश आबाजी वैद्य, वांद्रें

१०-०-० ,, केवळराम शंभूराम चुड-
कर, सुरत

२-०-० ,, आनंदराव खंडेराव
वेलिंग, मुंबई

२-०-० ,, पुरुषोत्तम गोपाळदास
घडियाळी, मुंबई

१-०-० ,, जनार्दन आत्माराम
देसाई, माटुंगा

०-४-० ,, एल. बी. सोनटक्के, मुंबई

५-४-० ,, एस. ए. पाटणकर, मुंबई

१०-०-० सौ. रमुबेन वेणीलाल दवे,
ठाणे

१-०-० श्री. लक्ष्मीबाई नारायण
गोरक्षकर, सान्ताक्रूस

११७१-४-३

जमा

रु..आ. पै

११७१–४–३

१–०–० सौ. सुशीलाबाई वसंतराव, सांताक्रूस

१–०–० कु. ताराबाई नारायण, सांताक्रूस

१–०–० ,, सीमंतिनी वसंतराव, ,,

१–०–० सदाशिव (बॉब) ,,

श्री. जयराम पांडुरंग वाक्कर, कराची यांच्यातर्फे आले ते:–

२–४–० सौ. रखमाबाई गुरुजी

१–४–० ,, गोपीकाबाई बक्षी

१–४–० ,, विमलबाई बोडस

१–४–० ,, जानकीबाई काणे

१–०–० ,, राधाबाई बागलवाडी

१–०–० ,, काशीबाई ओक

१–०–० ,, गंगाबाई ओक

१–०–० ,, गंगाबाई लेले

१–०–० ,, मनुताई गोखले

१–४–० ,, गंगाबाई देशमुख

१–४–० ,, वत्सलाबाई वाक्कर

१–४–० ,, कमळाबाई देसाई

१–४–० ,, मालतीबाई गुप्ते

१–०–० ,, सोनाबाई पेन्टर

१–१–० ,, निराबाई पवार

०–८–३ ,, सीताबाई करभरकर

०–४–३ ,, मुक्ताबाई गावडे

०–१०–३ ,, सत्यभामा चव्हाण

०–४–३ ,, गंगाबाई चितळे

०–८–३ ,, जानकीबाई देवधर

११९५–८–६

जमा

रु. आ. पै.

११९५-८-६

०-८-३ „ लक्ष्मीबाई लागू

०-८-३ „ द्वारकाबाई लागू

०-५-३ „ रमाबाई देवधर

०-५-३ „ पार्वतीबाई कडेकर

०-५-३ „ जानकीबाई जोशी

०-५-३ सौ. गंगाबाई साठे

०-५-३ „ सत्यभामाबाई गुप्ते

१-४-० श्री. सुंदराबाई शिंदे

०-४-३ „ मुक्ताबाई संभू

०-१०-० „ नर्मदाबाई बाबाजी

०-५-० „ रुक्मिणीबाई कटक

१-२-० „ बायाबाई नेरूरकर

१-४-० „ रुक्मिणीबाई मालवण-कर

०-५-३ „ मथुराबाई कुळकर्णी

०-५-३ „ लक्ष्मीबाई पै

०-१०-३ रुक्मिणीबाई चव्हाण

१-४-० „ राजूबाई मंद्रा

१-४-० „ सीताबाई हेजीप

०-८-३ „ आजीबाई फाटक

१-४-० „ वहिनीबाई लागू

०-५-३ „ यमुनाबाई शुक्ल

०-४-३ श्री. गणपतराव आंगणे

०-४-३ „ धाकू मोरे

०-४-३ „ रामराव मोरे

०-४-३ „ धोंडिराम आम्रे

०-५-३ „ शंकरराव कदम

१-४-० „ जनुभाऊ देशपांडे

१-४-० „ नाना भटजी

०-५-३ „ धीमल

१-४-० सौ. रुक्मिणीबाई कराळे, कराची, वाघकर मार्फत

१२१४-६-३

जमा

रु. आ. पै

१२१४-६-३

श्री. सुंदरराव नवलकर
मार्फत आलेले:

१-०-० श्री. मथुराबाई गोरे
३-०-० श्रीमंत वहिनीबाईसाहेब घोरपडे, इचलकरंजी
२-०-० श्री. शंकर त्र्यंबक कर्णिक, नाशिक
१-०-० ,, कृष्णराव प्रभाकर वैद्य, कल्याण
५-०-० ,, गजानन नारायण केदारी
१-०-० ,, वासुदेव नारायण चांदोरकर, कल्याण
१-०-० श्री. गोविंद लक्ष्मण फगसे, कल्याण
२-०-० ,, रामचंद्र त्रिंबक कर्णिक, कल्याण
१-०-० ,, गजानन त्रिंबक कर्णिक
१-०-० ,, भालचंद्र त्रिंबक कर्णिक
१-०-० ,, वामन त्रिंबक कर्णिक
१-०-० ,, प्रभाकर त्रिंबक कर्णिक
२-०-० ,, कृष्णराव नारायण मालपेकर
१-४-० सौ. कमळाबाई शूरसेन शा. जयकर, पार्ले
१-०-० श्री. द्वारकाबाई वासुदेव तळपदे
०-१२-० ,, रा. आ. तर्खड
९३-०-० श्रीसाईमहाराजांच्या पांच दिवसात पेटींत मिळाले ते पैसे

एकंदर सर्व पानांची मिळून आलेली जमा रुपये अक्षरीं तेराशें बत्तीस रुपये, सहा आणे तीन पै फक्त.

१३३२-६-३

श्रीशंकर

# संतचूडामणि श्रीसाईबाबामहाराज संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, यांच्या रामनवमीचे उत्सवांत मजूर-गाडी वगैरेंना पैसे दिले, त्याचा तपशील

| अनुक्रम नंबर | इसमाचें नांव | पैसे कशाबद्दल दिले | किती रुपये दिले | घेणाराची सही |
|---|---|---|---|---|
| १ | खुशालचंद रूपचंद मारवाडी | गाडीभाड्याबद्दल-कोपरगांव स्टेशन गाडी भाड्याबद्दल | ५८- | |
| २ | नारिंगीबाई मर्द सीताराम भाईजी शिर्डी | कढईभाडें | २ · | रघुनाथ पाटील शिंदे |
| ३ | गिरणीवाला कोपरगांवकर | गहूं, डाळ वगैरे दळून आणल्याबद्दल | २ | बाळा पिलाजी गुरव |
| ४ | मुरलीधर गोंदकर शिर्डी | पाणी तापविण्याबद्दल पांच-सहा दिवसांची मजुरी | १॥ | मुरलीधर गोंदकर |
| ५ | नाना दादा गायके | मजुरीबद्दल एकंदर | ३॥। | नाना दादा गायके |
| ६ | भजंभट पुणतांबेकर | मारुतीच्या अभिषेकाबद्दल | १ | भजंभट |
| ७ | विठोबा रंभा गोंदकर | स्वैंपाकाची चूल बांधण्याबद्दल | १ | विठोबा रंभा गोंदकर |
| ८ | जयवंता गणपती गायके व ओहळाजी | महार, मांग, वडारी वगैरे स्वैंपाक करण्याबद्दल | १। | जयंता गणपती गायके |
| ९ | रामगीर गोसावी | दक्षिणा | -॥- | रामगीर गोसावी |
| १० | बाळा पिलाजी गुरव | विड्याबद्दल | १ | बाळा पिलाजी गुरव |
| ११ | बाबु सुभाना रंगारी | पागोटें रंगविण्याबद्दल | -॥।- | बाबु सुभाना तांबे |
| | | | २०॥।- | |

| अनुक्रम नंबर | इसमाचें नांव | पैसे कशाबद्दल दिले | किती रुपये दिले | घेणाराची सही |
|---|---|---|---|---|
| | | | २०॥।- | |
| १२ | आणाजी कुंभार | उत्सवांत रांजण मडकीं वगैरे दिल्याबद्दल | पागोटे व १ रुपया | आणाजी कुंभार |
| १३ | पुंजा कोळी | उत्सवांत भांडीं घासण्याबद्दल | पागोटे व १ रुपया | पुंजा कोळी |
| १४ | विठोबा सुतार | सामानाची आणी करण्याबद्दल | पागोटे व १ रुपया | विठोबा सुतार |
| १५ | मधु न्हावी | कंदील पुसणें, लावणें, आणणें बद्दल | पागोटे व १ रुपया | मधु न्हावी |
| १६ | गिरिजा परिटीण | उत्सवांत धुणें धुण्याबद्दल | खण १ व २ रुपये | गिरिजा परिटीण |
| १७ | जमलाबाई मर्द कोंडाजी मुसलमान | प्रसाद | खण ।= | जमलाबाई |
| १८ | भिमाबाई | प्रसाद | खण ।= | भिमाबाई |
| १९ | तुळसाबाई मोलकरीण व गोपाबाई | रामनवमींत काम केल्याबद्दल | २॥ रु. १८= गोपाबाई २।= तुळसाबाई | तुळसाबाई |
| २० | तेलीण | तेलाबद्दल २ शेर | -॥- | तेलीण |
| २१ | तोलाबाई गोंदकरीण | दुधाबद्दल | २॥ रुपये | तोलाबाई |
| २२ | सीता तेलीण | दुधाबद्दल | -।- | सीता तेलीण |
| २३ | जव्हारमल मारवाडी | पत्रावळीबद्दल | १।॥=॥ | जव्हारमल |
| २४ | खुशालचंद मारवाडी | नारळ, खडीसाखर, सोडाखार | २॥- | खुशालचंद |
| २५ | गटु शिंदे | मिरच्या वगैरे गाडीभाडें कोपरगांव स्टेशन | १॥ रु. | गटु |
| २६ | दिगंबर | सदरा एक | -।= | |
| | | | ४०॥।-। | |

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन [वर्ग]णीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. [पी.]नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता काग[द्या]च्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें [लिहिले]ला कागदाचे दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध [न] करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती [किंवा] नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळ[वि]ल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे [रा]हील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक श्रीसाईलीला

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलें व केसरी, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व विद्वानांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला अशा संतकवि दा. स. प. श्री दासगणू महाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर ... M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

श्री पासष्टी-भावार्थ दीपिका

मिळण्याचें ठिकाण ... नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर आग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध राहावें.

बाळबाळंतिणींकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ८१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसांनंतर ८१४; बाळकडू—मूल जन्मल्यापासून देण्याजोगें ४८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ४१२.

सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

| एक रत्तल १।१० | ) द्राक्षासव ( | अर्धी रत्तल ८१४ |
|---|---|---|
| दीड रत्तल २८४ | | ट. ख. नि. |

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे ... मोठा यादीपत्रक व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "..." ही सात आण्यांची तिकिटें आलीं असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आर्योषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान व दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

एजंट—श्री साईनाथ आणि कंपनी.



हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ... ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ ... यांनीं छापून ... यांनीं ... येथें प्रसिद्ध केलें.